चंदन विचारे

# मयूरशिखा



# मयूरशिखा

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# मयूरशिखा

चंदन सुभाष विचारे

ई साहित्य प्रतिष्ठान

**मयूरशिखा (मुक्तछंद लघुकथा):**
**चंदन सुभाष विचारे**

संपर्क : ९६६४५०८६२६.
निवास स्थान : बी . एम . सी . इमारत क्र . सी /४, खोली क्र . १५
सरदार नगर -४, रावळी  कॅम्प फायर ब्रिगेड जवळ,
सायन - कोळीवाडा, मुंबई -४०००३७.
ईमेल : chandanmanse@gmail.com.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

This declaration is as per the Copyright Act 1957.  Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

**e**sahity@gmail. com

**e**Sahity Pratishthan

**e**leventh floor

**e**ternity

**e**astern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

App : https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.

प्रकाशन : ०७/०७/२०१९



©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक-आहे .

# चंदन सुभाष विचारे.



चंदन विचारे हे ई साहित्य परिवारातले लेखक. ते मुंबईमध्ये सायन-कोळीवाडा येथे राहतात. 'गेटवे मेरीटाईम प्रायव्हेट लिमिटेड' कंपनीत कस्टमर् सर्व्हिस एक्झिक्युटिव्ह या पदावर कार्यरत आहेत. परंतू मनाने मात्र ते महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यांतून आणि दुर्गांतून भटकत असतात. आणि त्यावर लिहीतही असतात.

प्रवासवर्णनपर लेख, प्रेम कथा, ऐतिहासिक विषयांवर लेख लिहितात, कविता व चारोळी करतात. ऐतिहासिक माहिती संकलनाची आवड आहे. त्यांचे लेख 'महाराष्ट्र टाइम्स' व 'सकाळ' या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होत असतात. 'सहाण' नावाचा कथासंग्रह 'ई साहित्य प्रतिष्ठान'कडून प्रकाशित झाला आहे.

थिंक महाराष्ट्र या वेब पोर्टलवर कल्याणचा भिडे वाडा आणि शिल्पकार श्री. भाऊ साठे यांचे डोंबिवलीतील शिल्पालय या विषयावर लेख प्रसिद्ध झाले आहेत. प्रतिलिपी, मराठीसृष्टी या वेब पोर्टलवरही त्यांच्या कथा व लेख प्रसिद्ध आहेत.

केवळ लिहीण्यावर ते थांबत नाहीत. ते अनेक मार्गांनी सामाजिक कार्य करत आहेत. ऐतिहासिक वास्तू व वस्तू संवर्धन यांसारख्या उपक्रमांमध्ये सहभागी होतात. ठाणे आणि चिपळूण येथील तोफ संवर्धन मोहिमेत सहभाग, मुंबईतल्या ब्रिटीशकालीन  मैलाच्या दगडांचा इतिहास उजेडात आणल्याबद्दल किल्ले वसई मोहिम परिवार तर्फे सन्मान पत्र देऊन सन्मानित, तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सदर दगडांच्या संवर्धनासाठी हेरिटेज कमिटी स्थापनेत त्यांचा मोठा वाटा आहे.

# भावनांचं असीम अवकाश

खरंतर एखाद्या पुस्तकासाठी प्रस्तावना लिहिण्याची ही माझी पहिलीच वेळ. अर्थात तशी ती लिहिण्यास मी पात्र आहे का याबद्दलही मला शंका आहे. कारण लेखन, संपादन आणि अनुवाद या क्षेत्रात अजून फक्त माझी सुरुवात झाली आहे. मला अजून खूप मोठा पल्ला गाठायचाय याचीही मला पूर्ण जाणीव आहे. पण तरीही मी ही प्रस्तावना लिहीत आहे याचं कारण म्हणजे सातत्यानं उत्तम लिखाणासाठी धडपडणारा माझा मित्र चंदन विचारे. चंदनचं लिखाण मी बऱ्याच महिन्यांपासून वाचत आलोय. माझ्या स्वतःच्या लिखाणाचा विषय जसा बहुतांश वेळा प्रेम आणि नातेसंबंध या मुद्द्यांना स्पर्श करतो तसंच चंदनच्या लेखणीचीही याच विषयांशी विशेष जवळीक आहे. तसं पाहायला गेलं तर हे विषय एकाच वेळी वैश्विक आणि प्रचंड वैयक्तिकही. वैश्विक या अर्थानं की जगाच्या पाठीवरील बहुतांश व्यक्तींमध्ये प्रेम ही भावना तितकीच तरल आणि हवीहवीशी असते आणि वैयक्तिक या अर्थानं की ही भावना समोरच्या व्यक्तीसमोर मांडण्याची, उलगडण्याची पद्धत अतिशय अनोखी आणि जगावेगळी असते. साहजिकच अशा संवेदनशील आणि वाचकांना हव्याहव्याशा वाटणाऱ्या विषयावर लिहिताना लेखकाला अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागते असं म्हटलं तर अतिशयोक्ती ठरू नये. किंबहुना हा आशय असणाऱ्या कथांची, कवितांची वा चंदननं जो प्रकार या पुस्तकातून हाताळला आहे त्या लघुकथांची मागणीच तशी असते. यामागचं मुख्य कारण म्हणजे प्रेम ही अशी गोष्ट आहे जी आपल्यापैकी प्रत्येकानंच कधी ना कधी अनुभवलेली असते. साहजिकच कथा वाचताना त्याच्या विशिष्ट अपेक्षा असतात. त्या अपेक्षांचा विचार करत लेखकाला आपल्या मनातलं वादळ कागदावर अलगद उतरवायचं असतं. अर्थात चंदननं या पुस्तकात ज्या कथा लिहिल्या आहेत त्या माझ्या मते रूढार्थानं आपण म्हणतो त्या लघुकथांपेक्षाही काहीशा लहान आहेत. पण म्हणूनच इथे लिखाणाची ही कसरत अजूनच कठीण बनते. त्यात चंदन बऱ्यापैकी यशस्वी झालाय असं म्हणायला हरकत नाही.

लव्ह, रिलेशनशिप अँड ऑल हा तरुणाईला आपलासा वाटणारा विषय हाताळताना घ्यावी लागणारी अजून एक महत्वाची काळजी म्हणजे रोमॅंटिसिझम कागदावर रेखाटताना तो कुठेही व्हलगॅरिटीकडे झुकू नये. कारण या कथा बहुतेकदा या सीमारेषेवरच घुटमळत असतात. अशा वेळी फार विचारपूर्वक शब्दनिवड करावी लागते. व्होकॅबलरीचा कस लागतो. या कसोटीवर चंदनच्या कथा हे व्यवधान बाळगूनच लिहिलेल्या कथा आहेत हे वाचल्यावर सहज जाणवतं. मी स्वतः लिहिताना या गोष्टीकडे फार बारकाईनं लक्ष देतो. त्यामुळे चंदनच्या लिखाणात ही बाब मला प्रकर्षानं दिसून आली, जे अर्थातच कौतुकास्पद आहे.

मला चंदनच्या कथा आवडल्या कारण त्यात असलेली पात्रं मला सच्ची वाटली. त्यांनी घेतलेला स्टॅन्ड त्यांच्या सिच्युएशननुसार कदाचित पटण्यासारखाही वाटू शकतो. पण त्याहीपेक्षा त्यात मला विशेष जाणवलेली गोष्ट म्हणजे 'बिटवीन दी लाईन्स' ओघळणारे अव्यक्त अर्थ. ते अर्थातच उघडपणे मांडलेले नाहीत. ते वाचकांना समजून घ्यावे लागतात. तीच या कथांमधली खरी गंमत आहे आणि या कथांचं वेगळेपणही.म्हणूनच या कथा वाचक मनापासून एन्जॉय करतील असं मला वाटतं.

लेखकाला सांगण्यासारखी एकच गोष्ट म्हणजे या कथांपैकी काही कथांमध्ये अजून मोठं बीज दडलेलं आहे. त्याचा सुयोग्य उपयोग करून घेत प्रदीर्घ आणि भक्कम बैठकीत लेखकानं ते कथाबीज रुजवावं आणि फुलवावं, जेणेकरून त्यात त्याला अजून काहीतरी गवसेल आणि वाचकांसमोर नवीनच कथाशय येऊ शकेल. त्यादृष्टीनं या ई बुकसाठी चंदनचं मनःपूर्वक अभिनंदन आणि एकूणच लिखाणाच्या पुढील वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा!

प्रणव कुलकर्णी

# मनोगत



नमस्कार मंडळी मी चंदन सुभाष विचारे.

तुम्ही मला आता बऱ्यापैकी ओळखत असालच. म्हणूनच मागील पुस्तकातील मनोगतात दिलेला वैयक्तिक माहितीचा कित्ता मी आता येथे पुन्हा गिरवत नाही.

लेखक म्हणून व्यक्त होत असताना आणि तुम्हा वाचकांच्या हाती माझे दुसरे पुस्तक देत असताना मला अतिशय आनंद होत आहे.

खरंतर आभार ई साहित्य प्रतिष्ठानचे कारण त्यांनी माझ्यावर, माझ्या शब्दांवर, माझ्या लेखणीवर विश्वास दाखवत मला पुन्हा लिहिण्यास प्रवृत्त केले.

कविता, चारोळ्या, प्रवासवर्णने, प्रेम कथा हे सारं लिहित असतानाच माझ्याही नकळत माझं लिखाण कधी अधिकाधिक परिपक्व होत गेलं अन् तुम्हा वाचकांच्या पसंतीस उतरलं हे माझं मलाही कळलं नाही.

"सहाण" लिहिल्यानंतर बऱ्याच वाचक मित्रमैत्रिणींचा एक सवाल गेले वर्षभर सतावीत होता." दुसरं पुस्तक कधी करतोयस ?

अखेर तुमची हि प्रतिक्षा पूर्ण झाली .

माझ्या पहिल्या सहाण या पुस्तकावर जितकं भरभरुन प्रेम केलत अगदी तसंच प्रेम तितकाच प्रतिसाद तुम्ही माझ्या या दुसऱ्या पुस्तकालाही द्याल अशी आशा बाळगतो.

आपला अभिप्राय माझ्यासाठी खूप महत्वाचा आहे. पुस्तकाच्या सुरुवातीसच माझा भ्रमणध्वनी क्रमांक, माझा ई मेल आयडी दिलेला आहे. त्यावर वा सोशल मिडीयाच्या माध्यमातून किंवा प्रत्यक्ष आपली भेट होईल तेव्हा न चुकता आपला अभिप्राय मला अन् ई साहित्य प्रतिष्ठानलाही कळवा.

कारण तुमचे हेच अभिप्राय मला अधिकाधिक तुमच्या पसंतीचे लिखाण करण्यास प्रवृत्त करतात.

धन्यवाद .

आपला

चंदन विचारे.

---------------------------------------------------------------

# अर्पणपत्रिका

नमस्कार वाचकहो.

दिनांक- ०७.०७.२०१७ रोजी ई साहित्य प्रतिष्ठानने

माझे पहिले पुस्तक "सहाण" प्रकाशित केले होते.

आपणांस कळविण्यास आनंद होतो आहे कि माझे दुसरे पुस्तकदेखील पुन्हा एकदा त्याच तारखेला ई साहित्यतर्फे प्रकाशित होत आहे.

मागीलप्रमाणे माझे हेही पुस्तक मी माझी आवडती जागा  नारळीबाग आणि माझ्या कल्पनेतल्या काव्याला अर्पण करीत आहे..

©चंदन विचारे.

# अनुक्रम

१. है तुझे भी इजाजत कर ले तू भी महोब्बत –

२. फ्रेंड रिक्वेस्ट-

३. पार्कातल्या गप्पा भाग  १

४. पार्कातल्या गप्पा भाग - २.

५. नाईट वॉक -

६. नजरभेट -

७  मैत्री -

८. व्यक्त -

९.  न जाने मेरे दिल को क्या हो गया..

१०. मिठी

११. पाऊस आणि ती –

१२. पावसाळी किस्से -

१३. किस्से प्रेमाचे -

१४. लग्न म्हणजे भाग १  -

१५. लग्न म्हणजे भाग २ -

१६. लग्न म्हणजे भाग ३-

१७. डेट भाग १-

१८. डेट भाग २-

१९. डेट भाग ३ -



ज्याप्रमाणे सौंदर्याने सुशोभित मोराच्या मस्तकातून

सुंदर तुरा (मयूरशिखा) उगवतो.

त्याचप्रमाणे सज्जनांच्या मस्तकातून

नेहमी सद्-विचारच प्रकट होत असतात.

-एक संस्कृत सुभाषित

# १. है तुझे भी इजाजत कर ले तू भी महोब्बत -

मंगळसूत्राइतकंच नवऱ्याचं कर्तृत्व चारचौघात मिरवायला स्त्रियांना फार आवडतं. पुराणकाळापासून स्त्रीला शक्तिस्वरुप मानलं गेलंय. काहीजण गमतीने तिला नवऱ्याला शिकवणारी त्याचे कान भरणारी म्हणून नवऱ्याची आद्यगुरु वगैरे संबोधतात पण ती शिकवण, कानभरणी चांगल्या गोष्टींसाठी असेल तर त्यात गैर ते काय?

असं म्हटलं जातं कि तिने ठरवलं तर ती रावाचा रंक अन् रंकाचा राव सुद्धा करु शकते. हो कारण तिच्यात ती क्षमता आहे.

तिला शक्ति मानलं जातं कारण घरात कठीण प्रसंगी, निर्णयप्रसंगी ती घरातल्या कर्त्या पुरुषामागे, मंडळींमागे ठामपणे उभी रहाते. त्यांना जमेल तशी तिच्यापरिने मदत करते. संसाराचा गाडा हाकते. म्हणूनच तर स्त्री आणि पुरुषाला संसाररुपी गाड्याची दोन चाकं म्हटलं जातं.

हि काल्पनिक कथा अशाच तीन पात्रांची आहे.

ती घरात एकुलती एक आई वडीलांची लाडकी. घरची परिस्थिती बेताची पण अशातही चांगलं शिक्षण घेऊन ती एका मोठ्या कंपनीत चांगल्या हुद्द्यावर कामाला लागली. वडील आता रिटायर्ड झालेले. आई घरीच. पोर लगीन वयात आल्याने घरच्यांना तिच्या लग्नाची काळजी लागलेली. तशी त्याने नातेवाईकांना, शेजाऱ्या पाजाऱ्यांना तिच्यासाठी चांगले स्थळ सुचविण्याविषयी सांगून ठेवलेले.

अशातच एके दिवशी तिला लग्नासाठी स्थळ आले. मुलगा दिसायला देखणा, चांगला कॅरम चँपियन. कामालाही बऱ्यापैकी. निर्व्यसनी*. सगळं कसं अगदी व्यवस्थित. नाव ठेवायला कुठेच जागा नाही. मुलीकडच्यांनी फारशी चौकशी न करता लगेच होकार कळवून टाकला.

ठरल्याप्रमाणे ठरल्यादिवशी लग्न झाले. लग्नानंतरचे सुरुवातीचे काही दिवस चांगले गेले. पण काही दिवसांतच तिच्या लक्षात आलं कि घरच्यांनी निर्व्यसनी म्हणून दाखवलेला नवरोबा कट्टर पिणारा आहे म्हणून. घरच्यांना उगा त्रास नको म्हणून तिने घरच्यांपासून ते दडवून ठेवलं पण खोटं फार दिवस थोडी ना लपून रहातं. त्याची दारु सोडविण्यासाठी तिने बरेच उपाय करुन पाहिले पण गडी सुधरायचं नावच घेईना. यातच दारुच्या नादापायी याने हातची चांगली नोकरी पण घालवली. त्याला सुधारण्याच्या प्रयत्नात  काही वर्ष निघून गेली. या दरम्यान नवरोबाने कामात नाही पण रात्री अंथरुणात बराच पुरुषार्थ गाजवत तिच्या पदरात दोन पोरी टाकल्या.

दारू पिऊन रात्री अपरात्री उशीरा घरी येणे. बायकोच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारहाण करणे, भांडण, शिवीगाळ हे आता नित्याचेच झाले. गोष्ट आता दोन्ही घरच्यांच्या हाताबाहेर गेली होती. बैठकी, समजूत, professional counselling सारे प्रकार करून झाले. पण पालथ्या घड्यावर पाणी. मध्यस्थांच्या बोलण्याला अन् मुलाकडच्याच्या दिखाव्याला मुलगी आणि मुलाकडची मंडळी फसली होती. घरची सगळी जबाबदारी, खर्च सगळं तीच समर्थपणे आपल्या खांद्यावर पेलत होती.

लग्न करुन कुठल्याकुठे आलो आपण असं तिला वाटत होतं. हसरी खेळती पोर आता जबाबदारीखाली पुरती झुकली होती. पोटच्या पोरी आता बालवाडीत टाकण्यालायक होऊ घातलेल्या. त्यांच्या शाळेच्या खर्चाची चिंता आता तिच्यापुढे उभी ठाकली होती. घरच्या गोष्टींचे परिणाम आता ऑफिसच्या कामावर उमटायला लागले होते. तिचं आता कशातच लक्ष लागत नव्हतं. पोर मोठी हुशार अशातही स्वतःला सावरुन सारं काही रेटित पुढे जात होती.

एके दिवशी ऑफिसला जात असताना वाटेत कॉलेजमधल्या एका जुन्या मित्राशी तिची गाठ पडली. तो तिच्या माहेरच्या घराशेजारील चाळीत रहायचा त्यामुळे बऱ्यापैकी ओळख होतीच. बरेच दिवसांनी भेट झाली म्हटल्यावर त्याने तिला चहासाठी विचारले. तो हि बऱ्याच दिवसांनी भेटला म्हटल्यावर तिने हो म्हटले. चहा पिता पिता दोघांच्या थोड्या गप्पा झाल्या. कॉलेजचे जुने दिवस त्या आठवणी वगैरे.

त्याने नुकतीच स्वतःची एक प्रायव्हेट कंपनी सुरु केली होती. बोलण्याच्या ओघात तिच्या लक्षात आलं कि, तिला ऑफिसला जायला उशीर झाला होता, ती आता त्याची रजा घेऊन ऑफिसला जायला निघाली. दोघांनी एकमेकांचे नंबर एक्स्चेंज केले. जुनी ओळख पुन्हा नव्याने झाल्यावर आता ती ऑफिसात असताना वरचेवर फोनवर बोलणं होऊ लागलं. बोलण्याच्या ओघात तिने त्याला तिच्या घरची परिस्थिती सांगितली.

घरच्या गोष्टी तिच्या ऑफिसपर्यंत पोहोचल्याने तिथेही गॉसिपिंग सुरु असायचं त्यात तिच्या नवरोबाने पैशासाठी एकदा थेट तिच्या ऑफिसातच येऊन तमाशा घातलेला. त्यामुळे हे

असे प्रकार पुन्हा घडता कामा नये अशी तंबीच तिच्या बॉसने तिला दिलेली. तिलाही आता इथनं ब्रेक हवा होता. तिने तिच्या त्या कॉलेजातल्या मित्राला तसं सांगून पाहिलं.

त्याच्याही कामाचा पसारा आता दिवसेंदिवस वाढत होता त्यामुळे तो हि एका असिस्टंटच्या शोधात होताच. अशातच तिचं जॉबसाठी विचारणं त्याच्यासाठी चांगलंच फायद्याचं होतं. त्याने तिला तशी जॉब ऑफर दिली. नविन कंपनी म्हटल्यावर तशी रिस्कपण होती अन् चांगलाच स्कोपही होता. तिलाही आता पंख पसरायचे होते. तिने लागलीच होकार कळवला. ठरल्यानुसार जुन्या ऑफिसला राम राम ठोकून ती नव्या ऑफिसात रुजू झाली. पण या नव्या जॉबविषयी तिने तिच्या नवऱ्याला अनभिज्ञच ठेवलं. कशाला ना उगा रिस्क.

नव्या ठिकाणी सारं काही आता सुरळीत सुरु होतं. त्याची हुशारी अन् तिची कल्पनाशक्ति याच्या जोरावर त्यांच्या कंपनीला आता नवे प्रोजेक्ट्स नव्या ऑर्डर्स मिळू लागल्या होत्या. या सगळयामुळे तो तिच्यावर भलताच खूश होता. ऑफिसात, बाहेर पार्टीसोबत मिटींगच्या निमित्ताने दोघांचं एकत्र येणंजाणं होत होतं. कधी नव्हे ते दोघांच्याही मनात एकमेकांविषयी एक सॉफ्ट कॉर्नर निर्माण झाला होता. एकमेकांची मतं, विचार जुळू लागले होते. त्याला तिच्या घरची परिस्थिती ठाऊक होती. आपण करतोय तो विचार चुकिचा आहे हे हि दोघांना मनातनं ठाऊक होतं. पण तरीही एके दिवशी तिचा चांगला मूड पाहून त्याने तिला त्याच्या मनात जागलेल्या तिच्या प्रेमाविषयी सांगितलंच.

तसा त्याला नकार देण्याचं कारणच नव्हतं पण तरीही उद्या समाज काय म्हणेल, नातेवाईक काय म्हणतील, घरचे काय म्हणतील या विचारांचं काहूर तिच्या मनात माजलेलं. लोकांच्या मते हा व्यभिचारच. पण या अशा बिनकामाच्या, दारुड्या, शंकेखोर, अंथरुणात

पराक्रम गाजवणाऱ्या नवऱ्यासोबत इतकी वर्ष राहून तरी तिच्या वाट्याचं सुख तिला कुठे लाभलं होतं. उलट नवऱ्याशी घटस्फोट घेऊन मित्रासोबत पुन्हा नव्याने संसार थाटण्यात तिचाच फायदा होता.

असंही त्याने त्याचं प्रेम कबूल करताना तिला तिच्या दोन्ही मुलींसकट स्वीकारण्याची तयारी दाखवलेली. लोकांचं काय त्यांना असेही चघळायला रोज नवे विष हवेच असतात. नवा विषय मिळाला कि जुनं च्युईंगम थुकून नवं चघळायला घ्यायचं. शिवाय दोन मुलींचा अख्खा भविष्यकाळ सरायचा बाकी होता. तिने ठरवलं आणि त्याला आपला होकार कळवला. बिनकामाच्या त्या नवऱ्याला घटस्फोट देत दोन्ही मुलींची कस्टडी स्वतःकडे ठेवत तिने तिच्या या मित्रासोबत नव्याने संसार थाटला.

आता तिला सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे गळयातलं मंगळसूत्र अन् नवऱ्याचा कर्तबगारपणा अभिमानाने चारचौघात मिरवता येत होता. त्याची शक्ती बनून त्याच्या कामात मदत करत तिने त्याला अन् त्याच्या कंपनीला आता एका वेगळयाच उंचीवर नेऊन ठेवलं होतं... कथेचा शेवट गोड तर सगळंच गोड चला तर मग कथेचा शेवट लाईफ इन अ मेट्रो चित्रपटाच्या एका गाण्याने करुया.


इन दिनों दिल मेरा,

तुझसे है कह रहा..

तु जी ले जरा,

है तुझे भी इजाजत कर ले तू भी महोब्बत..

# २. फ्रेंड रिक्वेस्ट-



फेसबुकवरचे नोटिफिकेशन्स चेक करता करता माझ्या एका फेसबुक फ्रेंडने शेअर केलेली तुझी पोस्ट नजरेसमोर आली, जरा मोठीच होती. आधीच मला वाचायचा कंटाळा त्यात तुझी हि पोस्ट. म्हटलं नुसतं लाईक करुन सोडून द्यावं. त्याने शेअर केलीये म्हटल्यावर नक्किच काहीतरी चांगलं लिहिलेलं असणार. वरवरच्या दोनचार ओळी वाचल्या अन छान वाटलं. म्हणून संपूर्ण पोस्टच वाचून काढली.

तुझं लिखाण भावलं मनाला. उत्सुकता वाढली. म्हटलं तू अजून काय काय लिहिलयस ते पहावं. चटकन तुझ्या नावावर क्लिक केलं. तुझ्या वॉलवर घुसखोरी करत तुझं वाचता येईल तितकं लिखाण अधाशासारखे वाचत सुटले. आई दोनदा बेडरुममधे मी झोपलीये का नाही याची खात्री करण्यासाठी डोकावून गेली. मी मात्र चादरीआड तुला वाचण्यात दंग झालेले. तुझ्या

माझ्यात आता तिचं सारखं डोकावणं नको म्हणून उठले अन सरळ बेडरुमच्या दरवाजाला आतून कडी घातली. आता चादरीचीही गरज नव्हती. तुला मोबाईलच्या छोट्या स्क्रीनवर पहाण, वाचणं मनाला पटत नव्हतं. मग लॅपटाप ऑन केला. तुझे फोटोज, तुझ्या पोस्ट, तुझे ब्लाग्स जमेल तेवढं नजरेखालून घालत होते.

रात्रीचे साडेतीन वाजले होते. सकाळी उठून ऑफिस. मनात तुझे विचार. तू लिहिलेल्या गोष्टी माझ्या मनातसुद्धा अगदी सहजतेने घर करुन गेल्या. आता मात्र मनाला आवर घालणं कठीण झालं होतं. तुझ्याबाबतीत बरच काही जाणून घ्यायचं होतं.पण कसं? त्यासाठी तुझ्याशी आधी मैत्री तर व्हायला हवी. मनात विचारांच द्वंद माजलं होतं, तुला फ्रेंड रिक्वेस्ट पाठवू कि नको? तुझी माझी ओळख नाही. तू माझ्याबद्दल काय विचार करशील? माझी फ्रेंड रिक्वेस्ट एक्सेप्ट करशील कि नाही? एक ना अनेक विचार मनात दाटून आले. काय करावं खरच सुचत नव्हतं.

मग ठरवलं. दोन मिनिटांसाठी डोळे बंद केले आणि उघडल्याबरोबर एका क्लिकसरशी तुला फ्रेंड रिक्वेस्ट पाठवून मोकळी झाले. "ऐक ना, मला मैत्री करायाचीये तुझ्याशी अगदी घट्ट मैत्री. खूप खूप बोलायचय तुझ्याशी. मनात कोंडलेलं सगळं शेअर करायचय तुझ्यासोबत. माझी फ्रेंड रिक्वेस्ट एक्सेप्ट करशील ना रे"..

# ३. पार्कातल्या गप्पा भाग १ -

संकू आणि रोहनला यायला बराच अवधी होता. तोवर काय करायचं या विचारात मी होतो. इथे सुविधाजवळ तासभर वाट पहात ताटकळत उभं रहाण्यापेक्षा पार्कात जाऊन बसायचं असं मी ठरवलं. माझ्या नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे मी नारळी बागेत जाऊन बसणं तुम्हाला अपेक्षित असेल पण मी काल ते उगाचच ते टाळलं. मनाशी ठरवल्याप्रमाणे मी पार्कात जाऊन बसलो.

वेळ जावा म्हणून व्हॉट्सअप अन् फेसबुकवरच्या चॅटिंग मधे मन रमवत बसलो. त्याचाही कंटाळा आल्यावर मग अवतीभवतीची माणसं न्याहाळत बसलो. समोरच्या बाकावर बसलेलं एक जोडपं तावातावाने एकमेकांशी भांडत होतं. त्यांच्या आणि माझ्यामधे बरंच अंतर असल्याने त्यांच्यात नेमकं कशावरून भांडण चाललय हे काही कळत नव्हतं. तिच्या डोळ्यातून वहाणारे पाणी, चेहऱ्यावरचे हावभाव, हातवारे यावरुन दोघांमधे काहीतरी सॉल्लिड गोची झाली होती एवढं मात्र खरं.

साला यांच्यामधे नेमकं काय घडतय शोधून काढायला हवं. माझ्या आतला जग्गा जासूस आता जागा झाला होता. त्यांच्यातल्या भांडणाचे पडसाद अवतीभवती उमटतायत हे तिथून चालणाऱ्या, बसलेल्या लोकांच्या चेहऱ्यावरचे भाव पहातात्या दोघांच्याही लक्षात आलं होतं. तसं त्यांनी तिथून निघायचं ठरवलं. ठरवल्याप्रमाणे दोघेही उठले अन् चालू लागले. मी हि ठरवलं यांचा माग काढायचा अन् यांच्यातल्या भांडणाचं मूळ शोधून काढायचं.

आता तुम्ही म्हणाल " तुला काही कामधंदे नाही का रे? का उगा इतरांच्या वैयक्तिक आयुष्यात लुडबूड करतोस वगैरे.. पण तुम्हाला माझी सल नाही कळायची. कित्येक दिवसांनी मला एक गोष्ट सापडली होती ती हि पात्रांसहित. का उगा सोडा ना !

तर ते निघाले थेट माझ्या आवाडत्या बागेच्या दिशेने. आकाशाचा निरोप घेण्याची सूर्याची वेळ जवळ येऊन ठेपली होती. आकाशात छान नारिंगी रंगाची छटा पसरली होती. कुठल्याही प्रेमी जीवाला वा निसर्गाची आवड असणाऱ्या व्यक्तीला आवडावे असेच वातावरण. समोर लाटांची गाज. मधेच सळसळणाऱ्या नारळीच्या झावळयांचा आवाज.

बागेतल्या कट्ट्यावर समुद्राच्या दिशेने दोघेही तोंड करुन बसले होते. तिच्या डोळयात दाटलेला अश्रुंचा महापूर अजूनतरी ओसरला नव्हता. मी त्यांच्या गप्पा अगदी सहज ऐकू येतील इतकं अंतर राखून बसलो होतो.

माझ्या कथेतल्या पात्रांशी माझी पुरती तोंडओळख झाली होती. त्याचं नाव शौनक आणि तिचं नाव शांभवी.

त्यांच्यातल्या भांडणाचं मूळ कारण सुमारे अर्धातास त्यांच्या शेजारी बसल्यानंतर मला कळालं. कथेत थोडे संवाद टाकतो म्हणजे कसं रिअलिस्टीक वाटेल. आय मीन वास्तववादी.

शांभवी - " मला नाही माहीत कसं कळलं घरच्यांना पण कळलं त्याला आता मी तरी काय करु? आपलं प्रेमप्रकरण आईने बाबांच्या कानावर घातल्यानंतर त्यांचा अवतार तू बघायला तिथे हवा होतास. मी जास्त काही बोलले असते ना तर कानफाटावलच असतं त्यांनी मला. माझं नशीब चांगलं कि त्यांनी माझ्यावर हात नाही उगारला. पण जाम तापलेत दोघंही.

आज माझा शेवटचा दिवस आहे ऑफिसचा. मी रिझाईन केलय. बाबांनी सांगितल्याप्रमाणे. शोना मला जॉबचं एवढं काही नाही रे पण तुला यापुढे भेटता येणार नाही. आणि मला ते नकोय. तू काहीही कर पण मला आज आता इथनं थेट तुझ्या घरी घेऊन चल."

शौनक - "शांभवी, तुला हे सगळं इतकं सोपं वाटतं का गं ! मला थोड वेळ दे. मी घरी येऊन बोलतो तुझ्या घरच्यांशी."

शांभवी - "त्याचा काही एक उपयोग होणार नाही. माझ्या घरच्यांना तू जास्त ओळखतोस कि मी? ते तुझाही अपमान करतील. प्लीझ ऐक माझं आपण पळून जाऊन लग्न करुया."

शौनक - "अगं वेडे थांब जरा. तुला काय पिक्चरची स्टोरी वाटते का गं? पळून गेलं म्हणजे झालं सगळं सॉल्व. हे रिअल लाईफ आहे इथलं जग वेगळं इथलं वास्तव वेगळं. Let me handle this matter. माझ्यावर विश्वास ठेव मी समजावेन तुझ्या घरच्यांना आणि आपल्या लग्नासाठी होकार मिळवेन. तू नको काळजी करुस."

शांभवी -" पक्का? आणि जर ते तरीही ऐकले नाहीतर?

शौनक - " तू का इतका निगेटिव्ह विचार करतेस. नाहीच ऐकले तर मग बघू काय करायच ते. तो पुढचा प्रश्न आहे. आधी मला आपल्या प्रेमाची बाजू त्यांच्यासमोर मांडू तर दे.

शांभवी त्याच्या डोळ्यात आशेने पहात होती. आपलं प्रेम घरच्यांच्या विरोधापुढे जिंकणार असा विश्वास तिला आता शौनकने मिळवून दिला होता. तिने आनंदाने त्याला मिठीच मारली. तिच्या डोळ्यांतून दुथडी भरुन वहाणारा अश्रुंचा महापूर आता त्याच्या मिठीत येऊन हलके हलके ओसरत होता..©चंदन विचारे. (सहज_सुचलेलं)

*टिप - कितीही खरी भासली तरी वरील कथा काल्पनिकच आहे.

# ४. पार्कातल्या गप्पा भाग - २.

ती - " थांबलास का? गा ना ! "

तो - " अच्छा म्हणजे तू ऐकत होतीस तर.

ती - " what do you mean ऐकत होतीस तर? तुला काय वाटलं मी तुझ्या खांद्यावर डोकं ठेऊन झोपले?

तो - " हो. तू काहीच बोलत नाहीयेस म्हटल्यावर काय करावं म्हणून मी आपलं गुणगुणत बसलो असा.

ती - " खरंच खूप छान वाटतं, अवतीभवतीचं कसलंच भान रहात नाही बघ. असं वाटतं तासन् तास असंच तुझ्या खांद्यावर डोकं ठेऊन, तल्लीन होऊन तुझं गाणं ऐकत बसावं."

तो - " अच्छा असं आहे तर."

ती - " हो असंच आहे. बरं ऐक ना ! माझं एक काम करशील? तो जो रपारप पावलं टाकित समोर मावळतीला चाललाय ना त्याला म्हणावं आज जरा सावकाशीनं, रेंगाळत, धीमी पावलं टाकित घरी जा. तुला घरी जायला उशीर झाला म्हणून काय कुणी रागे भरायचं नाही ! "

तो - " बरं, तू म्हणतेस तर सांगतो पण त्याचं काय जो मागच्या रांगेत माझा नंबर कधी येणार अशा प्रश्नार्थक नजरेने त्याच्या जाण्याची वाट पहात ताटकळत उभा आहे."

ती - " कोण?

तो - " अगं जरा मान मागे वळवून पहा तो चंद्र केव्हाचा येऊन बसलाय."

ती - " अच्छा तो होय, त्याला राहू दे असाच तिष्ठत उभा. त्याला कुणी आमंत्रण नव्हतं दिलं लवकर यायचं. आता आलाच आहेस लवकर तर रहा उभा वाट पहात म्हणावं. आणि असंही

त्याची करमणूक करण्यासाठी, त्याची काळजी घेण्यासाठी त्याच्या सोबत त्याच्या चांदण्या आहेतच कि. तुला का त्याची इतकी काळजी. त्याची काळजी वहाण्यापेक्षा तू तुझ्या कुशीत विसावू पहाणाऱ्या चांदणीची काळजी कर ना."

तो - " अरे वा ! मॅडम आज भलत्याच रोमेंटिक मूडमध्ये दिसतायत. आज घरी जाण्याची घाई नाही वाटतं." नाहीतर एरव्ही मॅडमचं लक्ष माझ्या बोलण्याकडे कमी आणि घड्याळयाच्या काट्याकडे जास्त असतं. घरचे कुठे बाहेर गेलेत वाटतं?

ती - " हं. आई बाबा गावी गेलेत. काहीतरी महत्वाच्या कामासाठी."

तो - " अच्छा, तरीच म्हटलं मॅडम आज इतक्या निवांत कशा काय?

ती - " तुम्हा मुलांना बोलायला सोपं वाटतं रे. मलाही वाटतं तुझ्यासोबत जास्तीत जास्त वेळ घालवावा म्हणून पण घरी जाऊन आईला मदत करायची असते. दिवसभराचा पसारा आवरायचा असतो, स्वयंपाकात तिला मदत करायची असते. भांडी घासायची असतात. तुमचं आपलं बरंय कामावरुन आलं कि थेट ताटावर बसायचं, जेवून झालं कि लगेच अंथरुणाकडे पाठ करुन झोपी जायचं."

तो - " हो हो, एवढं काही ऐकवायची गरज नव्हती. मी फक्त आज निवांत आहेस असं विचारलं, असो. "

ती - " बरं ते जाऊ दे, मला भुक लागलीय चल खाली जाऊन मस्तपैकी पाणीपुरी खाऊया. मी पाणीपुरी खाते तू शेवपुरी खा मग त्यावर थोडंसं आईसक्रीम खाऊन जाऊ दोघं आपआपल्या वाटेने आपआपल्या घरी." चालेल ना !

तो - "हो. चला निघूया..©चंदन विचारे.(सहज सुचलेलं)

# ५. नाईट वॉक -

तो- ' हॅलो....हा बोल आता. फोन करत होतीस?

ती - ' हो अरे केव्हाचा फोन ट्राय करतेय तुला, होतास कुठे तू इतका वेळ? आणि फोन का उचलत नव्हतास माझा? घरी सगळं ठीक आहे ना?

तो - ' हो हो सगळं ठीक आहे. काळजी करायचं काही एक कारण नाही. अगं हल्ली जेवल्यानंतर खाली बागेत थोडी शतपावली करायला जातो मी आणि महत्वाचं म्हणजे मोबाईल घरीच ठेऊन जातो.

ती - आता हे काय नविन! नाही म्हणजे तू वॉकला वगैरे जातोस इथपर्यंत ठीक आहे.तशी गरज आहेच तुला वॉकला जायची. कारण तुझ्या फोटोत हल्ली तुझ्यापेक्षा तुझा पोटोबाच जास्त पुढे येतोय म्हणून करत जा तू वॉक पण हे मोबाईल घरी ठेऊन जाण्यामागचं कारण काय?

तो - 'अगं हे बघ सकाळी जेव्हा मी ऑफिसला जातो तेव्हाचे ते आठ साडेआठ तास मी माझ्या बॉसचा असतो. तिथून सुटल्यावर मी तुझी भेट घ्यायला तुझ्यापाशी येतो तेव्हा तास दोन तास मी फक्त तुझाच असतो. तू सोबत नसतेस तेव्हा कट्ट्यावर तासनतास मी असतो माझ्या

मित्रांचा अन् तिथून घरी गेल्यावर माझ्या घरच्यांचा. तसा मी बरेचदा माझ्या नातेवाईकांचा असतो.

माझ्या समाजबांधवांचा असतो तर कधी कधी भटकताना नव्याने ओळख होऊ घातलेल्या एखाद्या अनोळखी व्यक्तीचाही असतो. म्हणजे काय तर मी माझा कधीच नसतो. '

ती - ' हं...तुझ्या बोलण्यात point आहे. बोल बोल तू बोल बिंधास्त मी ऐकतेय.'

तो - 'ओय तू माझी खेचत तर नाहीयेस ना?

ती - ' नाही रे बाबा, तू बोलत रहा कानाला ऐकायला छान वाटतंय. Something different.

तो - ' तर कुठे होतो आपण? तू अशी मधेच बोलत नको जाऊस link तुटते माझी.

हा तर ऐक. खरं सांगायचं तर या संपूर्ण दिवसभरात मी माझा कधीच नसतो असतो तर फक्त इतरांचा. मग अशा एखाद्या निवांतवेळी मी थोडावेळ स्वतःशीच बोलण्यात, स्वतःलाच जाणून घेण्यात व्यतीत केला तर त्यात problem काय आहे.

म्हणजे बघ ना, दिवसभरात घडून गेलेल्या चांगल्या वाईट गोष्टींबद्दल मलाही करायचं असतं चिंतन, मलाही मारायच्या असतात गप्पा माझ्या माझ्याशीच, मलाही विचारायचे असतात प्रश्न माझे मलाच पडलेले अन् शोधायची असतात त्यांची उत्तरं माझ्या परीने, सांगायच्या असतात मला सलणाऱ्या गोष्टी, माझी दुःखं, share करायचे असतात काही किस्से माझेच माझ्यासोबत, डांबून ठेवायची असतात काही रहस्यं हृदयाच्या काळकोठडीत साखळदंडांना बांधून, दिवसाभरात घडून गेलेल्या घटनांच्या बाबतीतली माझी मतं मलाच जाणून घ्यायची असतात,

थोडं सावरायचं असतं थोडं आवरायचंही असतं आणि म्हणूनच माझा माझ्याशी संवाद होणं गरजेचं आहे. त्यातूनच तर घडत जातो मी.'

ती - ' हं...अगदी बरोबर आहे तुझं म्हणणं.म्हणजे असा दिवसातून एकदा रोज आपला आपणच स्वतःशी संवाद साधला न कि कळतं आपल्याला आपण कुठे बरोबर होतो कुठे चुकिचे होते ते कुठल्या प्रसंगी आपण कसं react व्हायला हवं होतं ते, कठीण कठीण वाटणारे बरेच अवघड प्रश्न अगदी चुटकीसरशी सुटतात आणि मग लक्षात येतं कि, अरे अमुक ठिकाणी आपण थोडा संयम बाळगायला हवा होता, अमुक ठिकाणी समोरच्यावर आपण रागवणंच उचित होतं कि नव्हतं ते आणि असं बरंच काही सापडतं आपल्याला. खरं तर नव्याने गवसतो आपले आपणच आपल्याला.

कसलं भारी आहे रे हे !. तू बघच आता रोज रात्री जेवल्यानंतर मी पण walk ला जाणार. मोबाईल घरी ठेऊन. आमच्या टेरेसवर. आमच्या इथे जवळ तुमच्यासारखी बाग नाहीयेना म्हणून. बघू काय फरक पडतो का माझ्यात ते. असाही तू नेहमी टोमणे मारत असतोसच मला "अशी नको वागूस तशी नको वागूस " म्हणून.

तो - बरं आता घड्याळात बघितलेस का १२.०० वाजून गेलेत. सकाळी लवकर ऑफिसला जायचंय. झोपूया आता चल शुभरात्र.

ती - good night. swt drm. Tc ☺ - ©चंदन विचारे (संवाद सहज सुचलेला)

# ६. नजरभेट -

तो- ' हॅलो, तू निघालीस का ऑफिसमधून?

ती - ' हो आता नुकतीच. तू कुठेस?

तो - ' मी आपल्या नेहमीच्या वळणावर.'

ती - 'अरे पण मला ना आज थांबता येणार नाही. घरी काम आहे थोडं. दिवाळी आली ना सो फराळाची तयारी वगैरे. आईने बजावलय लवकर घरी ये म्हणून, रोजच्यासारखा उशीर नको. '

तो - ' मी वाट पहातोय. ये तू लवकर.'

ती - ' अरे नको, तू जा घरी उगाच नको थांबूस. असंही त्या वळणापासून स्टेशनपर्यंतचं अंतर फारफार तर ७-८ मिनटांचं. तेवढीच काय ती सोबत. हवं तर उद्या भेटू.'

तो - ' तुझ्यासाठी असेल ती ७-८ मिनटांची सोबत पण माझ्यासाठी तो ठेवा आहे गुलाबी क्षणांचा, आठवांच्या तिजोरीत जपून ठेवण्याजोगा.'© चंदन विचारे (सहज सुचलेलं)

# ७ मैत्री -

त्याच्याबद्दल  बरेचदा तिने घरच्यांकडनं ऐकलं होतं त्यामुळे त्याच्याविषयी तिला आधीपासनंच आकर्षण होतं. तो अधेमधे त्यांच्या घरी येतजात असे. दिसायला तसा बऱ्यापैकि होता. स्वभावानेही चांगला.त्यात तो कविता करतो, सोशल वर्क करतो हे सगळं तिला त्याच्याविषयी ऐकून माहिती होतं पण त्याच्याशी तसा प्रत्यक्ष बोलण्याचा कधी प्रसंग आला नव्हता.

तिने नुकतंच सोशल मिडीयाच्या दुनियेत पदार्पण केलं होतं. एके दिवशी तिने त्याच्या फेसबुक वॉलवर रपेट मारली अन त्याच्याविषयी जमेल तेवढी माहिती गोळा करायला तिने सुरुवात केली. फेसबुक वॉलवरच्या या रपेटीनंतर तिला आता तो आधिकच आवडायला लागला होता. पण काही केल्या भेटिचा, प्रत्यक्ष बोलण्याचा योग येत नव्हता. म्हणतात ना, "किसी चीज को अगर पुरे दिल से चाहो तो पुरी कायनात तुम्हे उसे मिलाने मे जुड जाती है". असच काहीसं यांच्या बाबतीत झालं. एक छोटासा क्रॉस मेसेज आणि दोघांच्या प्रत्यक्ष बोलण्याची सुरुवात.बऱ्यापैकि ओळख झाली. म्हणजे याआधी तशी तोंडओळख होती आता ती बऱ्यापैकी जुळून आली होती. ठरलं एक दिवशी दोघांनीही भेटायचं म्हणून.

ठरलेल्या जागी ठरलेल्या वेळी दोघेही भेटले. त्याला वाचनाची आवड आहे म्हणून खास निवडून तिने त्याच्यासाठी पहिल्या  भेटिची आठवण म्हणून दोन पुस्तके आणली. दोघेही भेटले.विचारांची देवाणघेवाण झाली. आणि मग तिनेच विषय काढून आपल्या मनातल्या गोष्टीला वाट मोकळी करुन दिली. तिने त्याच्याप्रति असलेल्या आपल्या प्रेमाची थेट कबुली दिली. अर्थात त्याने होकार द्यायलाच हवा अशी काही तिची अट नव्हती. तिला फक्त तिच्या मनात त्याच्याविषयी वाटणाऱ्या भावनांची त्याच्याजवळ कबुली द्यायची होती इतकंच. जी तिने दिली

होती. आता त्याची पाळी होती. खरं तर तिला नकार देण्यासारखं असं ठोस कारण काहीच नव्हतं त्याच्याकडे. ती सुशिक्षित होती. दिसायलाही  छान होती. दोघांचे विचार जुळत होते तरीही. तरीही त्याने तिला नकार दिला.

अर्थात यामागे त्याची अशी स्वतःची काही कारणं होती. जी तिला त्याने सांगितली. तिनेही ती स्वीकारली. आता पुढे काय. प्रेम नाही तर नाही निदान मैत्री तरी ! तो हो म्हणाला. मैत्री ठेवायला माझी काहीच हरकत नाही. पुढे मग दोघेही वरचेवर भेटू लागले, तासनतास गप्पा मारत बसायचे. तो बोलायचा आणि ती ऐकत बसायची. अर्थात तिला त्याचं बोलणं खूप आवडायचं. त्यांची मैत्री आता बऱ्यापैकी बहरली होती. सारं काही व्यवस्थित सुरु होतं. मधल्या काळात तो त्याच्या लिखाणात गढून गेला त्यामुळे त्यांच्या भेटीगाठीत अन गप्पांत तात्पुरता खंड पडला. लिखाणातून मोकळा वेळ मिळताच त्याने तिला पुन्हा संपर्क केला. त्यादिवशी तिने त्याला एक बातमी ऐकवली. या मधल्या काळात बरच काही घडून गेलं होतं. तिचं लग्न ठरलं होतं. अर्थात एक ना एक दिवस हि बातमी कानावर पडणार याची त्यालाहि कल्पना होती पण ती इतक्या लवकर ऐकू येईल याची कल्पना नव्हती. आपल्या हातून काहीतरी निसटल्याची भावना त्याच्या मनाला चाटून गेली.  पण त्याने सुरुवातीलाच या सगळयात पडायचं नाही असं ठरवलं होतं त्यामुळेच कि काय त्याने हे सत्यही अगदी सहज स्वीकारलं. दोन दिवसांपूर्वी तिने त्याला भेटण्याविषयी सुचवलं.अर्थात त्यालाही तिला भेटायचं होतच. पण नाही जमलं. कदाचित नियतीला ते मंजूर नसावं. दोन दिवसांवर तिचं लग्न येऊन ठेपलं होतं. त्याआधी दोघांच्याही दृष्टीने हि भेट महत्त्वाची होती. इच्छा असूनही जी नाही घेता आली. मनात साठलेल्या बऱ्याचशा गोष्टींचा कबुलीजबाब दोघांनाही एकमेकांजवळ द्यायचा होता. तिने तिच्या होणाऱ्या नवऱ्याला तिच्या अन त्याच्या मैत्रीच्या या नात्याविषयी आधीच सगळं काही सांगून टाकलं होतं त्यामुळे या दोघांच्या मैत्रीला त्याची काहीच हरकत नव्हती.

दोन दिवसांनी तिचं लग्न होईल. मित्रत्वाच्या नात्याने तो तिच्या लग्नाला जाईलही. पण पुढे लग्नानंतर तिला त्याला तितक्याच मोकळेपणाने भेटता येईल? एकत्र एकमेकांशी तासनतास गप्पा मारता येतील? तिच्या नवऱ्याचा नसेल आक्षेप या दोघांच्या मैत्रीला. पण आपल्याकडे समाजाची मानसिकता  लग्नानंतरची मैत्री पचवण्याइतपत अजून तितकिशी व्यापक झालीये का? हे आणि असे बरेच प्रश्न त्याच्या आणि तिच्या मनात रेंगाळतायत. येणाऱ्या काळात ते दोघेहि आपआपल्या परिने या प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न करतील. ते पुन्हा भेटतील किंवा भेटणार नाहीत माहित नाही.

पण या गोष्टीला अनुसरुन श्री. चंद्रशेखर गोखलेंची एक छानशी चारोळी आठवली.

" काही नाती तुटत नाहीत,

ती आपल्या नकळत मिटून जातात.

जशी बोटांवर रंग ठेऊन,

फुलपाखरं हातून निसटून जातात.."-©चंदन विचारे(सहज सुचलेलं)

# ८. व्यक्त -

सख्या अरे बोल ना ! तू बोलल्याशिवाय कसं कळेल मला कि तुझ्या मनात काय सुरु आहे ते? गेले कित्येक दिवस तुझं हे असच सुरु आहे. कुणाशी बोलत नाहीस, आधी कसं रात्रभर एकमेकांशी चॅट करत बसायचो आपण. आता मात्र लगेच जेवून झोपी जातोस तू. तुझ्या चेहऱ्यावरचं हसूपण कुठल्या कुठे विरलय, लिखाण बंद केलयस, बॅगेत नेहमी पुस्तकं घेऊन फिरणारा आणि गाडीत वेळ मिळताच वाचत बसणारा तू, हल्ली वाचेनासा हि झालायस.भटकंती थांबवलीस.एरव्ही शनिवार रविवार किंवा मग सुट्टी पडली कि तुझे पाय घरात थरायचे नाहीत. खांद्याला बॅग लावून चालू पडायचास हुंदडायला निसर्गाच्या सानिध्यात.आता मात्र सुट्टिच्या दिवशी घरात ठाण मांडून बसतोस.

तेव्हा मी बोलायचे तुला "अरे किती भटकतोस जरा आराम कर" आणि तू म्हणायचास "आराम हराम आहे माझ्यासाठी ". तासनतास गप्पा मारत बसायचो आपण बागेत. तू बोलत रहावस आणि मी नुसतं ऐकत रहावं असच वाटायचं.

तू बोलायचास, "नेहमी नेहमी मीच किती बोलायचं तू हि काहीतरी बोल कि".

मी म्हणायचे "नाही तूच बोल मी ऐकते".

तू म्हणायचास "असं कसं तू व्यक्त व्हायला कधी शिकणारेस ! माणसं व्यक्त होऊ लागली कि ती आणि त्यांचे स्वभाव उलगडू लागतात".

आता नेमकं तुला हवं तसं घडतंय तर तू अबोला धरलायस. तुझ्या म्हणण्याप्रमाणे मी शिकलेय व्यक्त व्हायला, तर तू हा असा ठोंब्यासारखा तोंडात पानाचा विडा कोंबल्यासारखा हुप्प झालायस. तुला परत पूर्वीसारखच लिहितं, वाचतं हसरं आणि भटकं झालेलं पहायचय मला..

तेव्हा तू म्हणायचास आता मी म्हणतेय "सख्या प्लीज व्यक्त हो ना रे"...©चंदन विचारे(सहज सुचलेलं)

# ९. न जाने मेरे दिल को क्या हो गया..

अभी तो यही था अभी खो गया -

पावसाळा सुरु होण्यापूर्वी निसर्ग विविध संकेत देत असतो आपल्याला त्याच्या येण्याचे. निसर्गाने दिलेले हे संकेत, वातावरणात घडणारे बदल यामुळे पावसाच्या येण्याची चाहूल लागत असते. आणि मग शिगेला गेलेली उत्सुकता, आपल्याला लागलेली ओढ तो त्याच्या आगमनाने शमवतो. त्याच्या येण्याने सारेच सुखावतात. प्राणी, पक्षी, पानं-फुलं, माणसं अवघा निसर्गच त्याच्या जलधारांच्या वर्षावात चिंब न्हाऊन निघालेला असतो. अगदी तशीच काहीशी गोष्ट असते प्रेमाची.

पावसाप्रमाणेच प्रेमही आपल्या आयुष्यात येण्याचे संकेत आपल्याला देत असतं. हलकेच अलगद पावलांनी प्रेम आपल्या येण्याची चाहूल देऊन जातं.

ते संकेत एकदा का आपल्याला कळाले, ती चाहूल एकदा का जाणवली कि मग सुरु होतो आपला प्रवास पुन्हा नव्याने प्रेमाच्या दिशेने. आणि एकदा का ते प्रेम आपल्या आयुष्यात आलं कि, मग आपण आपले रहातच नाही. शरीर आपलं आपल्यापाशीच असतं पण मन नाही. ते आपण आधीच त्याच्या /तिच्या हाती सुपुर्द करुन मोकळे झालेले असतो. मग आपण स्वतःच स्वतःला प्रश्न विचारु लागतो कि, खरच मला हे काय झालंय? माझ्या मनाची हि अवस्था का? गेले कित्येक दिवस माझं मन माझं माझ्यापाशीच होतं. असं नेमकं काय घडलं कि ते आता माझंच उरलं नाही.

मग सुरु होतं मनाचं मनाशीच द्वंद. एक मन सांगत असतं हे प्रेमच आहे आणि दुसरं त्याच्या अगदी विरुद्ध भुमिका मांडत असतं.ते सांगत असतं हे प्रेम नाही हा भास आहे, तुझ्या मनाचा खेळ आहे. दुसऱ्या मनाने कितीहि समजावू पाहिलं तरी पहिलं मन आपल्या मतावर ठामच असतं. ते सांगत असतं कि, तू कितीही नाही म्हण, तू याला भास म्हण किंवा खेळ म्हण पण माझ्यासाठी हे प्रेमच आहे.

प्रेमाच्या याच अवस्थेत मग शरीर मनाला लागलेले प्रेमाचे डोहाळे पुरवू लागतं. त्याला डोहाळे लागतात तिच्या/ त्याच्या भेटिचे, तिला/त्याला एकवार डोळेभरुन पहाण्याचे. मनात बरच काही साठलेलं बोलायचे. भेटीआधी ठरवल्याप्रमाणे बरच काही ठरवलेलं असतं मनाशीच तिच्याशी/त्याच्याशी नेमकं काय बोलायचय ते पण जेव्हा ती समोर येते नेमके तेव्हाच हे शब्द ओठांवरुन माघारी फिरतात. सुचतच नाही जे आधी ठरवलेलं असतं बोलायचं. वेळेची सबब सांगत मग ती / तो निघून जातात. आणि काही वेळापूर्वी आपल्याशीच फितुरी केलेले आपलेच शब्द पुन्हा ओठांवर परत येतात.तोवर ती/ तो बरेच पुढे निघून गेलेले असतात.नजरेसमोर असते ती पाठमोरी आकृती.मग अशावेळी वाटतं वेळेला अन् तिला/त्याला थांबवावसं, पुन्हा मागे फिरवावसं घड्याळयाच्या काट्यांसारखं. वाटतं तिने/ त्याने एकवार मागे वळून पहावं आणि मग आपणही नजरेनेच सांगावं जे मनी दाटलं होतं, जे ओठांवर आलं होतं, जे सांगायचं राहून गेलं होतं. वेळ निघून गेलेली असते पण आपण मात्र तिथेच चरफडत उभे असतो मनाला दोष देत, ओठांशी अडखळलेल्या शब्दांना दोष देत. मनाप्रमाणेच शरीर भानावर येतं आणि मग आपण आपली नेहमीची ठरलेली वाट चालू लागतो.

शरीर चालत असतं पण मन ! मन तिथेच त्या प्रेमाच्या वळणावर तिच्या परत येण्याची तिची एक झलक पहाण्याची वाट पहात खोळंबलेलं असतं.प्रेमाची हि जादू अशीच असते.

आपल्याच नकळत आपल्याला हरवून टाकते. ती एकदा आपल्यावर चालायला लागली कि मग संमोहित झाल्यप्रमाणे आपण त्याच्या /तिच्या हाती आपलं सारं सर्वस्व सोपवून मोकळे होतो. आणि मग भानावर आल्यावर पुन्हा या खालील गाण्याच्या ओळी गुणगुणत रहातो. ठाऊक असतं आपल्यालाही कि, आपण प्रेमात आहोत पण तरीही शंभरदा मनाला प्रश्न विचारत बसतो एक गोड खात्री करुन घेण्यासाठी....कि खरंच तुला प्रेम झालंय? आणि मग मनही ओरडून ओरडून सांगतं कि,

हो गया है तुझको तो प्यार सजना

लाख कर ले तू इनकार सजना

दिलदार सजना, है ये प्यार सजना

देखा न तूने, मुड़के भी पीछे

कुछ देर तो मैं रुका था

जब दिलने तुझको रोकना चाहा

दूर तू जा चुका था

हुआ क्या न जाना, ये दिल क्यों दीवाना

हो गया है तुझको तो प्यार ...

अए वक़्त रुक जा, थम जा, ठहर जा

वापस ज़रा दौड़ पीछे

मैं छोड़ आयी, खुद को जहाँ पे

वो रह गया मोड़ पीछे

कहाँ मैं, कहाँ तू

ये कैसा है जादू

हो गया है तुझको तो प्यार ... खरच आनंद बक्षींनी किती छान लिहून ठेवलय आणि तितकाच सुंदर आवाज लतातार्इंचा आणि उदितनारायणांचा.कितीदा ऐकलं तरी पुन्हा पुन्हा प्रेमात पडावंसं वाटतं.

# १०. मिठी -

संध्याकाळची वेळ. ती आणि तो दोघे मरीन ड्राईव्हच्या समुद्रकिनाऱ्यावर बसलेले असतात. पावसाळ्याचे दिवस, सोसाट्याचा वारा आणि समोर खवळलेला समुद्र. एव्हाना एकमेकांमधे थोडं अंतर राखून बसलेली ती हळूच त्याच्या जवळ सरकते.

ती - " ऐक ना, मला कवेत घे ना तुझ्या. "

तो - " आता हे काय नविन खूळ ? "

ती - " आधी घे ना मग सांगते."

तो तिला घेतो हलकेच मिठीत.

तो - " झालं समाधान ! बोल आता. "

ती - " काय बोलू? काहीच सुचत नाही तुझ्या मिठीत आलं कि. तुझ्या हृदयाचे ठोके ऐकता ऐकता हरवून जाते मी एका वेगळयाच जगात. जिथे तुझ्या माझ्याशिवाय तिसरं कुणीच नसतं. विसरुन जायला होतं भवतालचं सारंकाही तुझ्या मिठीत आलं कि. खरं सांगायचं तर तुझ्या मिठीइतकी सुरक्षित जागा दुसरी कुठलीच नाही असं वाटतं मला.

स्वर्गसुख म्हणजे काय हे तुझ्या मिठीत शिरल्यावर कळतं. तुझ्या या माझ्याभोवती आवळलेल्या बाहुपाशातून बाहेर पडूच नये असं वाटतं. मनातलं सारं काही रितं करावसं वाटतं तुझ्या मिठीत मागे काहीही न ठेवता. मी आनंदात असो वा दुखाःत तुझ्या मिठीत आले कि सुखावतेच. अशी कोणती जादू आहे या मिठीत सांग ना मला? "

तो - " हं जादू तर आहेच. प्रेमाची जादू जी तुला माझ्या मिठीत शिरताच स्वतःला विसरायला भाग पाडते.

जी तुला या धावत्या जगातून प्रेमाच्या रंगीबेरंगी दुनियेत घेऊन जाते, जी तुला मन मोकळं करायला भाग पाडते,  जी तुला प्रेमाच्या सरींनी ओलीचिंब करते, तुझ्या व्यथा -दुःख साऱ्याची भूल पाडते अशी जादू.. कळलं आता ! "

ती - " हो कळलं मग आता अजून एक काम कर. जादूगारासारखा एखादा प्रेमाचा मंत्र पुटपुटून मला कैद  करुन ठेव तुझ्या मिठीत..©चंदन विचारे...(सहज सुचलेलं)

---

# ११. पाऊस आणि ती –

त्याच्या येण्याची वाट पहात ठरलेल्या वेळी, ठरलेल्या ठिकाणी ती उभी होती आडोशाला. पावसाच्या हलक्या सरी बरसत होत्या. ती आडोशाला असली तरी त्या सरींचा हलकासा वर्षाव तिच्यावरही अधून मधून होत होता. सरींच्या त्या अलवार स्पर्शाने ती हि सुखावत होती. हसत होती हळूच गालातल्या गालात. सरींच्या त्या प्रत्येक स्पर्शाने ती हरवून जात होती त्याच्या आठवणीत. एव्हाना ती पुरती शिरली होती त्याच्या आठवणींच्या गावात अन् इतक्यात तो आला. त्याने जागं केलं तिला, बाहेर आणलं तिला त्या आठवांच्या गावातून. म्हणाला,

"कुठे हरवलीस? चल निघायचं ना ! " तशी ती जागी झाली म्हणाली, " हो निघूया पण आपल्या दोघांत हि छत्री नको. "

तो म्हणाला अगं असू दे कि पाऊस आहे, भिजशील तू."

त्यावर ती म्हणाली,

" तू येण्याआधी त्याने मला पुरतं भिजवलंय तुझ्या आठवांच्या सरींनी.

आता तुझ्यासोबत प्रत्यक्ष पावसात भिजण्याचे सोपस्कार तेवढे बाकी आहेत. चल, ते हि पुरे करु..

# १२. पावसाळी किस्से -

ती - " हॅलो, कुठेस तू? "

तो - "ऑफिसमधे."

ती - "ऐक ना, आम्हाला लवकर सोडतायत आज. अरे आज पाऊस खूप आहे ना म्हणून. निघेन आता मी. तू काय करतोयस? नाही म्हणजे निघ लवकर तू पण. बाहेर पाऊस बघ किती कोसळतोय."

तो- "हो आम्हालाही सोडतायत.निघेन पाच- दहा मिनटात मी पण. अगं पण ऐक ना, तू आज घरी नको ना जाऊस."

ती - "तू वेडा बिडा झालायस का? What do u mean घरी नको जाऊस ! मग कुठे जाऊ? "

तो - "अगं तसं नाही म्हणजे थोडं उशीरा गेलं तर नाही का चालणार? "

ती - " तू काय बोलतोयस तुझं तुला तरी कळतय का? एकतर इथे जोराचा पाऊस आणि त्यात ट्रेन बंद झाल्या तर काय करु मी?

तो - " लगेच काही बंद बिंद पडत नाहीत गाड्या. आणि तसेही तुझे कोणी तरी नातेवाईक असतीलच ना मुंबईत मावशी, आत्या, काका वगैरे. एक दिवस त्यांच्याकडे रहा. "

ती - " अरे पण तुझ्या डोक्यात काय चाललय ना मला खरच काही कळत नाही. बरं थांब मी घरी फोन करुन सांगते आईला. प्रभादेवीला मावशी रहाते माझी तिच्याकडे जाईन मी रहायला. But at least तुझा प्लान काय आहे ते तरी सांगशील ! "

तो - "सांगतो तू आधी दादरला भेट मग सांगतो. "

ती - "बरं, येते मी."

ठरल्याप्रमाणे दोघंही दादरला भेटतात आणि मग तिथून टॅक्सीने वरळी सी फेस.

ती - " कसला नाटकी आहे रे हा बघ ना, ऑफिसमधून निघताना वाटलं होतं कि आता हा ट्रेन्स बंद पाडतोय कि काय.आणि आता तर ह्याने complete look च चेंज केलाय. एवढ्या हौसेनं आपण इथे आलो तर ह्याने लगेच आपला गाशा गुंडाळायला घेतला. बरं ऐक आपण कणीस खाऊया भाजलेलं मजा येईल. "

तो - " हो हो खाऊया पण आता नाही नंतर आणि अगं बरंच आहे कि, जोर ओसरलाय त्याचा पण बरसणं त्याने थांबवलं नाही अजून. रिमझिम बरसतो आहेच कि तो. "

ती - " कसलं भारी वाटतं ना इथे आल्यावर.मस्त वारा सुटलाय. लाटा आदळतायत धडाधड किनाऱ्यावर. आज कि नाही मनसोक्त भिजूया आपण."

तो - " आपण नाही फक्त तू भिजणारेस. मी आता हा वीनशीटर घालून तुला इथूनच भिजताना पहाणार आहे."

ती - ए hello this is not fair ok. "

तो - " ते फेअर अनफेअरचं काय ते तू मला ठरवू दे.

ठरवल्याप्रमाणे मी आज फक्त तुला न्याहाळणार आहे. पहायचंय मलाही आज हा पाऊस तुला किती अन् कसा न्हाऊ माखू घालतो ते. पहाणार आहे पावसाच्या या रिमझिम बरसणाऱ्या धारा तुझ्यावर बरसताना अन् तू त्या तुझ्या अंगांगावर झेलताना.

मी फक्त टिपणार आहे तुला आणि तुझ्या शुभ्र तनुवरनं ओघळणाऱ्या त्या हरएक टपोऱ्या थेंबांना. कैद करायचं ठरवलयं मी आज त्या साऱ्या ओल्या चिंब क्षणांना या कॅमेऱ्यात. साठवून ठेवणार आहे मी तुला नजरेतही, हृदयातही अन् या कॅमेऱ्यातही पुढच्या अनंत काळासाठी."

ती - " wow, कसला भारी आहेस तू. म्हणूनच मला खूप खूप खूप आवडतोस. I love you so so soooo much."

तो - " अगं हो हो किती जोराने ओरडतेस, सगळे बघतायत आपल्याकडे." ती - " त्यात काय बघतायत तर बघू दे, जळत असतील तर जळू देत. I don't care. मला नाही तमा या जगाची. माझ्यासाठी माझं जग फक्त तू आहेस, फक्त तू...© चंदन विचारे (सहज सुचलेलं)

# १३. किस्से प्रेमाचे -

ती - "हॅलो, रात्री ऑनलाईन का नव्हतास तू? मला बोलायचं होतं तुझ्याशी."

तो- " अगं मग फोन करायचास ना. मी झोपलो काल लवकर. कंटाळा आला होता."

ती - " फोनच करत होती चेक कर आधी."

तो -" ओह शीट I am sorry. मी नाही पाहिलं. काय झालं बोल."

ती - " तू आज लवकर सुटशील ना ऑफिसमधून? भेटू आणि मग बोलू. लवकर ये मी वाट पहीन."

तो - " हं चालेल. काही सिरीयस आहे का? "

ती - " तू आधी भेट तर मग बोलू."

तो - "ठिक आहे येतो मी. " फोनवर ठरल्याप्रमाणे नेहमीच्या ठिकाणी दोघेही भेटतात. आता पुढे...

तो - "बोल आता काय झालं? "

ती - " ऐक ना, माझी ती परळची आत्या आहे ना, तिने माझ्यासाठी एक स्थळ आणलय. मुलगा दिसायला बरा आहे, इंजिनीअर आहे, घरी पण सर्व चांगलं आहे त्याच्या. म्हणजे फायनान्शिअली वगैरे." तो - मग आता? "

ती - " आता काय? घरचे पाठी लागलेत. आज जाणार आहेत मम्मी पप्पा पत्रिका जुळतेय का ते पहायला भटाकडे. तू काहीतरी कर ना लवकर प्लीज. " तो - " मी काय करु? आज

ना उद्या हे होणार हे मला ठाऊक होतं म्हणूनच तुला सांगत होतो कि, आपल्या रिलेशनशिपबद्दल घरी आधीच सांग म्हणून.आता झाली ना तुझीच पंचाईत."

ती - " हा तू बोलला होतास पण माझा धीर होत नव्हता तेव्हा. भिती वाटत होती."

तो - " भिती कसली त्यात अगं ओरडले असते, चिडले असते तुझ्यावर ते फार फार तर हात उगारला असता तुझ्यावर."

ती- " ऐ तू मला सांगतोयस कि घाबरवतोयस?. नीट सांग ना काय करु ते. जाम टेंशन आलय मला. तू कर काहीतरी मला माहित नाही. नाहीतर घर सोडून पळून येईन मी तुझ्या."

तो - " हि जी हिम्मत आहे न तीच घरी दाखव. पळून जायची पाळीच येणार नाही.नीट विश्वासात घेऊन समजावून सांग दोघांनाही आपल्याबद्दल. हे बघ प्रत्येक आईवडीलांची एकच प्रामाणिक इच्छा असते कि, आपली मुलगी जिथे कुठे राहिल तिथे ती सुखी रहावी. आणि तुला फक्त त्यांना एवढच समजवून सांगायचंय कि तुझं सुख हे आपल्या लग्नात आहे म्हणून."

ती - " तुला काय वाटतं? ऐकतील ते माझं ? "

तो- " तू मनापासून समजावून सांगितलं तर नक्की ऐकतील.मला खात्री आहे. तू एक काम कर आत्ताच बाबांना फोन करुन सांग कि, मला तुमच्याशी बोलायचंय. घरी लवकर या म्हणून. तू शांतपणे सारं काही सांग त्यांना आपल्याबद्दल. मगाशी म्हटल्याप्रमाणे ते रागावतील - चिडतील थोडे पण तू मात्र शांत रहा.

काहीही झालं तरी तू तुझा संयम सोडायचा नाही. आणि जर नाहीच ऐकले तुझ्याने तर मग मला सांग मी येईन घरी. मी पटवून देईन त्यांना कि, त्यांच्या मुलीचं सुख कशात आहे ते. पण पहिला प्रयत्न हा तुलाच करायला हवा.

" अजिबात टेंशन घेऊ नकोस. मी आहे तुझ्यासोबत काहीही झालं तरी."

ती - " हं ठीक आहे. बोलेन मी घरच्यांशी.  ऐक ना, काहीतरी खाऊया चल ना  मला जाम भुक लागली आहे. "

तो -  " तू पण ना वेडू आहेस वेडू.. हा असा अवखळ वेडेपणा करतेस न म्हणूनच जास्त आवडतेस मला..



# १४. लग्न म्हणजे भाग १ -

तर मंडळी हि कथा आहे रुत्विक आणि रुचिराची.

हा आहे आपल्या कथेचा नायक - 'रुत्विक भोसले'

वय वर्षे २७. चांगला उंचपुरा, पिळदार शरीरयष्टीचा, दिसायला देखणा. मुंबईतल्याच एका प्रायव्हेट लि. कंपनीत मार्केटिंग मॅनेजर. वरळीत स्वतःचा वन बीएचकेचा फ्लॅट.स्वतःची फोर व्हिलर.घरी आई वडील, बहिणीचं नुकतच लग्न झालेलं. बाबा बँकेत कॅशियर आणि आई गृहिणी. चांगलं सुशिक्षित घराणं.

आता वळूया कथेच्या नायिकेकडे हि आहे - 'रुचिरा घाग' वय वर्षे २५. रहायला डोंबीवलीत. कामाला लोअर परळला एका कॉर्पोरेट हब मध्ये एच आर पदावर. दोघेही चांगले उच्चशिक्षित. दोघांच्याही घरच्यांना त्यांच्या लग्नाची काळजी असल्याने त्यांनी वेगवेगळया लग्न जुळवणाऱ्या संस्थात त्यांची नावे नोंदवलेली. सध्याचा जमाना इंटरनेटचा असल्याने दोघांनीही एका इंटरनेट वेब साईटवरसुद्धा आपआपली नाव नोंदणी केलेली असते.

अशातच एके दिवशी रुत्विकच्या व्हॉट्सअपवर त्याच्या बहिणीचा मेसेज येतो अंजलीचा अन् मॅसेज पाठवून झाल्यावर काही वेळातच तिचा फोन. अंजली-" हॅलो दादा अरे ऐक ना, मी एका मुलीचा फोटो आणि डिटेल्स पाठवलेत तुला व्हॉट्सअपवर. पाहिलेस का? "

रुत्विक- " हो, तेच चेक करत होतो. चांगली आहे दिसायला आणि तिचं प्रोफाईल पण छान आहे." अंजली - "म्हणजे आवडली ना तुला? अरे आमच्या शेजारच्या जोशी काकू रहातात

ना त्यांनी सुचवलय स्थळ. बाबांना सांगून पत्रिका दाखवून घे ज्योतिषाकडे. जुळत असेल तर मग पुढची बोलणी करायला."

रुत्विक- " अगं नाही म्हणजे मुलगी छानच आहे. मला आवडलीय.पण मी काय म्हणतो हे पत्रिका वगैरे पहाणं मला तरी फारसं पटत नाही. अगं जग कुठल्या कुठे पोहोचलय आणि आपण अजुनही त्या पत्रिकांमधले गुण जुळवत बसलोय."

अंजली - " हे बघ रुत्विक मला काय म्हणायचय तुझी मतं पटतायत मला पण पूर्वीपासनं हे असच चालत आलय.हे बघ तू आई बाबा तिघं मिळून ठरवा नी मला कळवा काय ते लवकर. मी पण तिला तुझी माहिती पाठवलीय बघू काय उत्तर येतं ते समोरुन. चल मला कामं पडलीयेत बरीच. मी नंतर करते फोन तुला."

एव्हाना इथे रुचिराच्या वहिनीच्या मोबाईलमधेही रुत्विकची माहिती पोहोचलेली असते.

वहिनी- " अहो ऐकलंत का? तुमच्या लाडक्या बहिणीसाठी एक छानसं स्थळ आलय.बघताय का? रुचिराचा दादा - " थांब चष्मा लावू दे. हं दाखव पाहू. हं बरा आहे मुलगा. रुचिराला आणि आई बाबांना पण दाखव. तिला आवडला कि मगच पत्रिका पाहून ठरवू पुढचं काय ते." नवऱ्याने सांगितल्याप्रमाणे रुचिराची वहिनी रुचिरा आणि आई बाबांना फोटो माहितीसहित दाखवते.

वहिनी- "काय गं आवडला का मुलगा? "

रुचिरा - " हो म्हणजे दिसायला छान आहे आणि प्रोफाईल पण मला सुटेबल आहे."

वहिनी -"बरं मग उद्याच श्रीकृष्ण मंदिरात ते ज्योतिषी बसतात ना त्यांना दाखवून पाहू पत्रिका जुळतेय का ते."

दोघांनीही फोटो अन् प्रोफाईल पाहून एकमेकांना पसंत तर केलेलं असतंच पण आता सारं काही पत्रिका जुळण्यावर अवलंबून असतं. दुसऱ्याच दिवशी दोघांचेही घरचे आपआपल्या ज्योतिषाकडे पत्रिका घेऊन. दोघांच्याही पत्रिका पाहून झाल्यावर दोन्हिकडचे ज्योतिषी - "अं हं कठीण आहे, अवघे १३च गुण जुळतायत." पत्रिका जुळत नसली तरी रुचिराचा फोटो पाहिल्यापासून इथे रुत्विकला काही चैन पडत नसते. त्याच्या डोक्यात विचारचक्र फिरु लागली असतात. ताईकडनं तिचा नंबर मागायचा तरी कसा आणि ती देईल लगेच हे कशावरुन.म्हणून मग दुसऱ्याच दिवशी रुत्विक फेसबुकवर तिचं प्रोफाईल सापडतय का ते पहात असतो.तेवढिच तिच्याविषयी थोडीफार माहिती मिळालीच तर बरं म्हणून. थोडं सर्फिंग केल्यावर रुचिराचं प्रोफाईल सापडतं.

क्षणाचाही विलंब न लावता रुत्विक तिला मेसेंजरवर मेसेज पाठवून मोकळा होतो.पत्रिका जुळो न जुळो पण आता लग्न करायचं तर ह्याच मुलीशी असं रुत्विकने मनोमन ठरवलेलं असतं...

# १५. लग्न म्हणजे भाग २ -

रुचिराच्या घरच्यांनी पत्रिकाच जुळत नाही आहे म्हटल्यावर रुत्विकच्या बहिणीमार्फत नकार कळवायचं ठरवलं. तसं ठरवलं जरी असलं तरी यावरुन रुचिराच्या घरातच आता दोन गट पडले होते. एक रुचिराचे आई बाबा आणि दुसरे म्हणजे रुचिराचे दादा वहिनी. आई वडील थोडे धार्मिक प्रवृत्तीचे असल्याने त्यांचा पत्रिकेवर आणि ज्योतिषाच्या म्हणण्यावर ठाम विश्वास. रुचिराचे दादा वहिनी मात्र रुचिरा कुठल्या बाजूने कौल देते यावर विसंबून होते. रुचिराच्या मनाविरुद्ध काही करायचं नाही हे त्यांचं मत. शिवाय त्यांच्या मते हे स्थळ उत्तम असल्याने पत्रिका बाजूला ठेवून रुचिरा आणि रुत्विकने एकमेकांना प्रत्यक्ष भेटल्यानंतरच काय तो निर्णय घ्यावा असं त्या दोघांच मत पडलं. या दोन गटांत रुचिराची चांगलीच पंचाईत झाली होती. नेमका कल कोणाच्या बाजूने द्यावा? शेवटी प्रश्न आयुष्याचा होता. घाईघाईत निर्णय घेऊन चालणारं नव्हतं. काय करावं या विवंचनेत असतानाच तिचं लक्ष मोबाईलकडे गेलं. तिने पटकन नेट ऑन केलं. पण या दोन दिवसाच्या गडबडीत काल रात्रीच तिचा नेट पॅक संपल्याचं तिच्या आता कुठे लक्षात आलं.

रुचिरा- "शीट यार याला पण आताच संपायचं होतं. आई मी जरा बाहेर जाऊन येते. माझा नेट पॅक संपलाय तो रिचार्ज करुन येते."

रुचिराची आई- "हो जा पण लवकर ये. कुठे मैत्रीणीकडे जात बसू नकोस."

रुचिरा - " हो गं."

रुचिरालाही आता जरा विचार करण्यासाठी वेळ आणि एकांत हवा होता. तिने दुकानात जाऊन नेट पॅक पुन्हा रिचार्ज करुन घेतला. नेट ऑन करताच भराभर मेसेजेस येऊ लागले. त्यातच फेसबुक मेसेंजरवर एक मेसेज आला होता. कुणाचा आहे हे ओपन करुन पाहिलं तेव्हा ध्यानात आलं कि रुत्विकचा मेसेज आहे म्हणून. ती मेसेज वाचू लागली.

" हेलौ मी रुत्विक भोसले, तुमची पत्रिका, फोटो आणि प्रोफाईल पाहिला. छान आहे. मला आवडला. आईबाबा ज्योतिषाकडे पत्रिका पाहून आले. अपेक्षित असे गुण जुळत नाहीयेत. तुम्ही पत्रिका दाखवलीत का तुमच्या ज्योतिषाकडे? खरं सांगायचं तर माझा या पत्रिकेतील गुण जुळण्यावर अजिबात विश्वास नाही. पत्रिकेतील गुण जुळण्यापेक्षा मनाचं जुळणं अधिक महत्वाचं या मताचा मी आहे. पत्रिका जुळत नाही म्हणून काय झालं मनं जुळतायत का ते पाहू. तुमच्या बाजूने पत्रिका जुळो अथवा न जुळो.

थेट नकार देण्याअगोदर निदान एकदा तरी आपण एकमेकांना भेटायला हवं असं मला तरी वाटतं. तुमच्या उत्तराची वाट पहातोय."

रुत्विकचा फोटो आणि त्याचा जॉब प्रोफाईल तिला अगदी सुटेबल होता.त्यामुळे घरचे म्हणताय म्हणून, पत्रिकेतील गुण जुळत नाहीयेत म्हणून नकार देणे तिच्याही सदसद् विवेकबुद्धीला पटत नव्हते. काय करावं काहीच कळत नव्हतं. रुत्विकचं बोलणं तिलाही मनोमन पटलं होतं. पण काय करावं, कुणाला विचारावं अशातच तिला प्रियाची आठवण झाली.' प्रिया मराठे' रुचिराची प्रिय सखी. कॉलेजपासूनची. रुचिराने क्षणाचाही विलंब न लावता प्रियाला फोन लावला.

रुचिरा - "हेलौ प्रिया मी रुचि बोलतेय.

प्रिया - "अगं हो नंबर सेव्ह आहे तुझा, बोल काय झालं."

रुचिरा- " तुला ठाऊक आहे ना माझ्या घरचे माझ्यासाठी मुलगा बघतायत लग्नासाठी. तर अगं मला ना एक चांगलं स्थळ आलंय."

प्रिया- " वॉव, दॅट्स ग्रेट यार. मग विचार कसला करतेस. तुला मुलगा आवडलाय ना! होकार देऊन मोकळी हो."

रुचिरा - "अगं हो पण एक प्रोब्लेम झालाय. आमची पत्रिका जुळत नाहीये."

प्रिया- "अगं ये येडपट कुठल्या जगात वावरतेयस तु. हो म्हणजे मला मान्य आहे कि पुर्वीपासून हे सगळं चालत आलय पण मी काय म्हणते जर सगळं काही व्यवस्थित असेल तर थोडा वेगळा विचार करायला काय हरकत आहे. काळानुरुप विचार बदलायला हवेत रुचिरा हे काय मी तुला सांगायला हवं."

रुचिरा- "हो मला कळतय गं सगळं पण आईबाबा पत्रिकेवरच अडून बसलेत आणि त्यात मी आताच मेसेंजरवर चेक केलं. रुत्विकचा मेसेज आलाय. तो भेटायचं म्हणतोय एकदा. काय करु कळत नाहीये काहीच म्हणून मग तुला फोन केला."

प्रिया- " माझं ऐकणार असशील तर मी म्हणेन कि त्याला भेटून घे. नंतर पश्चाताप करुन घेण्यापेक्षा." रुचिरा - "हं चालेल."

प्रिया - " ओय नुसतं चालेल बोलू नकोस, त्याला मेसेज करुन कळव कि तू त्याला भेटतेस म्हणून. मी रात्री फोन करते तुला, मला सांग काय ठरलं ते आणि हो जाण्याआधी दादा किंवा वहिनी कुणाला तरी विश्वासात घेऊन सांग."

रुचिरा - "हो गं आता ठेव फोन."

प्रियाकडनं मनासारखं उत्तर आल्याने रुचिरालाही आता रुत्विकला भेटावसं वाटत होतं. घरी जाऊन तिने वहिनीला विश्वासात घेऊन सगळं सांगितलं. अर्थात वहिनी तिच्या बाजूनेच होती. वहिनीने लगेचच होकार दिला. दादा वहिनींचा पाठिंबा आहे म्हटल्यावर रुचिराचा धीर आता वाढला होता. तिने मेसेंजरवर दिलेल्या फोन नंबरवर फोन केला.

रुचिरा - "हॅलो मी रुचिरा बोलतेय, रुत्विकराव बोलताय का? "

रुत्विक- "हो बोलतोय, तुम्ही बोला ना."

रुचिरा - "तुम्ही बोलत होता ना भेटायचय म्हणून." रुत्विक - "हो तुम्ही तयार असाल तर मग भेटू केव्हाही तुम्ही सांगाल तेव्हा सांगाल त्या ठिकाणी."

रुचिरा - "संध्याकाळी भेटूया का? पाच ते सहा च्या दरम्यान? दोघांनाही सेंटरला जमेल अश्या ठिकाणी." रुत्विक - "मग दादर किंवा ठाणे? तुम्ही सांगा तुम्हाला कुठे यायला आवडेल ते. तुम्ही डोंबिवलीत म्हणालात तरी माझी तयारी आहे."

रुचिरा - "नाही नको, दादरला चालेल मला." रुत्विक - "ठिक आहे मग संध्याकाळी ५ वाजता तुम्ही दादर स्टेशनबाहेर सुविधाजवळ या. तिथून जवळच #लग्न म्हणजे भाग २ - रुचिराच्या घरच्यांनी पत्रिकाच जुळत नाही आहे म्हटल्यावर रुत्विकच्या बहिणीमार्फत नकार कळवायचं ठरवलं. तसं ठरवलं जरी असलं तरी यावरुन रुचिराच्या घरातच आता दोन गट पडले होते. एक रुचिराचे आई बाबा आणि दुसरे म्हणजे रुचिराचे दादा वहिनी. आई वडील थोडे धार्मिक प्रवृत्तीचे असल्याने त्यांचा पत्रिकेवर आणि ज्योतिषाच्या म्हणण्यावर ठाम विश्वास.रुचिराचे दादा वहिनी मात्र रुचिरा कुठल्या बाजूने कौल देते यावर विसंबून होते. रुचिराच्या मनाविरुद्ध काही करायचं नाही हे त्यांचं मत. शिवाय त्यांच्या मते हे स्थळ उत्तम असल्याने पत्रिका बाजूला ठेवून रुचिरा आणि रुत्विकने एकमेकांना प्रत्यक्ष भेटल्यानंतरच काय तो निर्णय घ्यावा असं त्या दोघांच मत पडलं. या दोन गटांत रुचिराची चांगलीच पंचाईत झाली होती. नेमका कल कोणाच्या बाजूने

द्यावा? शेवटी प्रश्न आयुष्याचा होता.घाईघाईत निर्णय घेऊन चालणारं नव्हतं. काय करावं या विवंचनेत असतानाच तिचं लक्ष मोबाईलकडे गेलं. तिने पटकन नेट ऑन केलं. पण या दोन दिवसाच्या गडबडीत काल रात्रीच तिचा नेट पॅक संपल्याचं तिच्या आता कुठे लक्षात आलं. रुचिरा- "शीट यार याला पण आताच संपायचं होतं. आई मी जरा बाहेर जाऊन येते. माझा नेट पॅक संपलाय तो रिचार्ज करुन येते." रुचिराची आई- "हो जा पण लवकर ये. कुठे मैत्रीणीकडे जात बसू नकोस." रुचिरा - " हो गं." रुचिरालाही आता जरा विचार करण्यासाठी वेळ आणि एकांत हवा होता. तिने दुकानात जाऊन नेट पॅक पुन्हा रिचार्ज करुन घेतला. नेट ऑन करताच भराभर मेसेजेस येऊ लागले.त्यातच फेसबुक मेसेंजरवर एक मेसेज आला होता. कुणाचा आहे हे ओपन करुन पाहिलं तेव्हा ध्यानात आलं कि रुत्विकचा मेसेज आहे म्हणून. ती मेसेज वाचू लागली. " हेलौ मी रुत्विक भोसले, तुमची पत्रिका, फोटो आणि प्रोफाईल पाहिला. छान आहे.मला आवडला. आईबाबा ज्योतिषाकडे पत्रिका पाहून आले. अपेक्षित असे गुण जुळत नाहीयेत. तुम्ही पत्रिका दाखवलीत का तुमच्या ज्योतिषाकडे? खरं सांगायचं तर माझा या पत्रिकेतील गुण जुळण्यावर अजिबात विश्वास नाही. पत्रिकेतील गुण जुळण्यापेक्षा मनाचं जुळणं अधिक महत्वाचं या मताचा मी आहे. पत्रिका जुळत नाही म्हणून काय झालं मनं जुळतायत का ते पाहू. तुमच्या बाजूने पत्रिका जुळो अथवा न जुळो.थेट नकार देण्याअगोदर निदान एकदा तरी आपण एकमेकांना भेटायला हवं असं मला तरी वाटतं. तुमच्या उत्तराची वाट पहातोय." रुत्विकचा फोटो आणि त्याचा जॉब प्रोफाईल तिला अगदी सुटेबल होता.त्यामुळे घरचे म्हणताय म्हणून, पत्रिकेतील गुण जुळत नाहीयेत म्हणून नकार देणे तिच्याही सदसद् विवेकबुद्धीला पटत नव्हते.काय करावं काहीच कळत नव्हतं.रुत्विकचं बोलणं तिलाही मनोमन पटलं होतं.पण काय करावं, कुणाला विचारावं अशातच तिला प्रियाची आठवण झाली.' प्रिया मराठे' रुचिराची प्रिय सखी. कॉलेजपासूनची. रुचिराने क्षणाचाही विलंब न लावता प्रियाला फोन लावला. रुचिरा - "हेलौ प्रिया मी रुचि बोलतेय. प्रिया - "अगं हो नंबर सेव्ह आहे तुझा, बोल काय झालं." रुचिरा- " तुला ठाऊक आहे ना माझ्या घरचे माझ्यासाठी मुलगा बघतायत लग्नासाठी. तर अगं मला ना एक चांगलं स्थळ आलंय." प्रिया- "

वाव, दॅट्स ग्रेट यार. मग विचार कसला करतेस. तुला मुलगा आवडलाय ना! होकार देऊन मोकळी हो." रुचिरा - "अगं हो पण एक प्रोब्लेम झालाय. आमची पत्रिका जुळत नाहीये." प्रिया- "अगं ये येडपट कुठल्या जगात वावरतेयस तु. हो म्हणजे मला मान्य आहे कि पुर्वीपासून हे सगळं चालत आलय पण मी काय म्हणते जर सगळं काही व्यवस्थित असेल तर थोडा वेगळा विचार करायला काय हरकत आहे. काळानुरुप विचार बदलायला हवेत रुचिरा हे काय मी तुला सांगायला हवं." रुचिरा- "हो मला कळतय गं सगळं पण आईबाबा पत्रिकेवरच अडून बसलेत आणि त्यात मी आताच मेसेंजरवर चेक केलं. रुत्विकचा मेसेज आलाय. तो भेटायचं म्हणतोय एकदा. काय करु कळत नाहीये काहीच म्हणून मग तुला फोन केला." प्रिया- " माझं ऐकणार असशील तर मी म्हणेन कि त्याला भेटून घे. नंतर पश्चाताप करुन घेण्यापेक्षा." रुचिरा - "हं चालेल." प्रिया - " ओय नुसतं चालेल बोलू नकोस, त्याला मेसेज करुन कळव कि तू त्याला भेटतेस म्हणून. मी रात्री फोन करते तुला, मला सांग काय ठरलं ते आणि हो जाण्याआधी दादा किंवा वहिनी कुणाला तरी विश्वासात घेऊन सांग." रुचिरा - "हो गं आता ठेव फोन." प्रियाकडनं मनासारखं उत्तर आल्याने रुचिरालाही आता रुत्विकला भेटावसं वाटत होतं. घरी जाऊन तिने वहिनीला विश्वासात घेऊन सगळं सांगितलं. अर्थात वहिनी तिच्या बाजूनेच होती. वहिनीने लगेचच होकार दिला. दादा वहिनींचा पाठिंबा आहे म्हटल्यावर रुचिराचा धीर आता वाढला होता. तिने मेसेंजरवर दिलेल्या फोन नंबरवर फोन केला.

रुचिरा - "हॅलो मी रुचिरा बोलतेय, रुत्विकराव बोलताय का? "

रुत्विक- "हो बोलतोय, तुम्ही बोला ना."

रुचिरा - "तुम्ही बोलत होता ना भेटायचय म्हणून." रुत्विक - "हो तुम्ही तयार असाल तर मग भेटू केव्हाही तुम्ही सांगाल तेव्हा सांगाल त्या ठिकाणी."

रुचिरा - "संध्याकाळी भेटूया का? पाच ते सहा च्या दरम्यान? दोघांनाही सेंटरला जमेल अश्या ठिकाणी." रुत्विक - "मग दादर किंवा ठाणे? तुम्ही सांगा तुम्हाला कुठे यायला आवडेल ते. तुम्ही डोंबिवलीत म्हणालात तरी माझी तयारी आहे."

रुचिरा - "नाही नको, दादरला चालेल मला.

रुत्विक - "ठिक आहे मग संध्याकाळी ५ वाजता तुम्ही दादर स्टेशनबाहेर सुविधाजवळ या. तिथून जवळच कुठल्यातरी रेस्टॉरंटमधे बसू आणि बोलू. ओके भेटूच मग आणि हो थँक्स."

रुचिरा - "थँक्स कशासाठी! मी येईन वेळेवर. तसाही आज माझा वीकऑफ आहे.भेटूच मग, ठेवते फोन." आता फक्त संध्याकाळ कधी होतेय याची वाट दोघेही पहात होते. पहिलीच भेट. दोन्हीकडे सारखीच उत्सुकता.

पुढच्या भागात काय होणार याची आता तुम्हांला लागलीये ना अगदी तशीच..

# १६. लग्न म्हणजे भाग ३-

ठरल्याप्रमाणे ठरल्यावेळी रुचिरा रुत्विकची वाट पहात सुविधाजवळ उभी होती. रुत्विक गाडी पार्क करुन आला.

रुत्विक- "आय एम सॉरी मला यायला फार उशीर झाला का? "

रुचिरा- " छे, नाही मी नुकतीच येऊन उभी राहिली होते."

रुत्विक- "बरं मग निघायचं का? इथे जवळच एक रेस्टाॅरंट आहे तिथे बसून बोलू.चालेल ना? ".

रुचिरा- " हो का नाही."

दोघेही जवळच्याच एका रेस्टाॅरंटमधे जाऊन बसले.रुत्विकने दोघांच्याही आवडीनुसार वेटरला ऑर्डर दिली. ती येईपर्यंत दोघांनी एकमेकांविषयी जितकं जास्त जाणून घेता येईल तितकं जाणून घेतलं. ऑर्डर केलेल्या खाद्यपदार्थ येताच त्यांचा आस्वाद घेत असतानाच रुत्विकने आता थेट मुद्द्यालाच हात घातला.

रुत्विक- " तुमचं घोडं अजूनही पत्रिकेवरच अडलय कि विचार बदललाय? "

रुचिरा-" इतक्या लगेच कसं काय ! नाही म्हणजे आता कुठे आपली थोडीफार ओळख झालीये म्हटल्यावर विचार करायला थोडा वेळ लागेलच ना !" रुत्विक-" दिला, वेळ दिला. पण वेळ हातातली वेळ निघून जाण्याइतपत वेळ घेऊ नका म्हणजे झालं." रुचिरा- "तेवढं कळतं मला." रुचिरा जरा लटक्यातच बोलली.

रुत्विक-"बरं मी तुमच्यासाठी काहीतरी आणलय." असं म्हणत रुत्विकने पिशवीतनं काहीतरी काढून रुचिराच्या पुढ्यात ठेवलं. रुचिरा- "काय आहे यात? " रुत्विक- " भेट आहे छोटीशी, आपल्या पहिल्या भेटिची आठवण म्हणून."

उत्सुकता जास्त न ताणता रुचिराने गिफ्टचं रॅपर पटकन उघडलं आणि..

रुचिरा - " wow.. awesome.. खरच छान पण याची काही गरज होती का? "

रुत्विक- " मला वाटलं घ्यावसं मी घेतलं."

रुचिरा- "हा पण हे असं पहिल्याच भेटीत.. घरचे काय म्हणतील."

रुत्विक- " सांगा मी दिलं म्हणून नाहीतर मग विकत घेतलं आवडलं म्हणून असं सांगा."

रुचिरा- " पण तुम्हाला माझ्या या आवडींविषयी कसं ठाऊक?

रुचिराला आवडलेलं गिफ्ट काय होतं हे जाणून घ्यायचं असेल ना तुम्हाला! सांगतो.

रुत्विक- " तुमच्या फेसबुक अकाउंटवरनं आणि इथून तिथून थोडी रेकी करुन माहिती मिळवली तुमच्या आवडिनिवडींविषयी. तेव्हा कळलं तुम्हाला लव स्टोरीज आणि अर्जित सिंगची गाणी खूप आवडतात म्हणूनच हे एक खऱ्याखुऱ्या प्रेमकथेवरचं पुस्तक आणि हि अर्जित सिंगच्या गाण्यांची सिडी. आय नो हल्ली एका क्लीकवर युट्युबवर हवे ते गाणं सर्च करुन ऑनलाईन अथवा डाऊनलोड करुन ऐकता येतं पण तरीही वाटलं आपली एक आठवण रहावी म्हणून घेतलं. तशीही आता या अशा गिफ्टची सवय करुन घ्या कारण या पुढेही वारंवार या ना त्या कारणाने आपण भेटणार आहोतच."

रुचिरा- " इतका कॉन्फिडन्स? मुलींना पहिल्या भेटीतच इंप्रेस करायची हि पद्धत छान आहे पण तरीही एक प्रश्न आहेच. विचारु? "

रुत्विक- " विचारा कि अगदी निसंकोचपणे विचारा." रुचिरा - "मी इथे येणार याची इतकी खात्री कशी काय, नाही म्हणजे मी आयत्यावेळीही नकार कळवू शकले असते इथे यायला."

रुत्विक - " नुसती खात्री नाही पक्कं ठाऊक होतं, तुमच्याशी चॅटवर आणि फोनवर बोलत असतानाच काही अंदाज मनाशी बांधले होते ते हि अगदी सहज." रुचिरा- " ओह, ते कसे काय? "

रुत्विक - " सांगतो, पत्रिका जुळत नाहीये असं सांगत तुमच्या घरच्यांनी परवा आपल्या लग्नाला नकार दिला. मी तुम्हाला विचारल्यावर तुम्ही तेच कारण देऊन सरळ सरळ नाही बोलू शकला असता पण तुम्ही तसं काही केलं नाही.तुम्ही माझं म्हणणं शांतपणे ऐकून घेतलंत, त्यावर शांतपणे विचार केलात अन् मग आजिबात घाई न करता थोडा वेळ घेऊन तुम्ही इथे यायचा निर्णय घेतलात. याचाच अर्थ मी तुम्हाला आवडलोय आणि तसं नसतं तर तुम्ही थेट नाही बोलून मोकळ्या झाला असता आणि तसं झालं असतं तर मी एका सुंदर, सुस्वभावी, शांत, प्रेमळ, संयमी, समजुतदार मुलीला मुकलो असतो".

रुचिरा- "ओ हो आय एम रिअली इंप्रेस्ड.मला भेटण्याआधीच माझ्यातल्या गुणांची पारख नुसती माझ्या बोलण्यावरुन केलीत. आता खरं तर असं वाटतय कि, मी घरच्यांचं ऐकून तुम्हाला थेट नकार कळवला असता तर मी हि तुमच्यासारख्या हुशार, हँडसम मुलाला भेटण्याची चांगली संधी गमावली असती पण आता विचार करायला काहीच हरकत नाही. तुम्ही मेसेजमधे म्हटल्याप्रमाणे पत्रिका जुळत नसली तरी मतं आणि मनं जुळायला सुरुवात झालीये खरी.नाही पण तरीही मला थोडा वेळ घ्यायचाय. कारण आयुष्याचे हे असे महत्त्वाचे निर्णय एका भेटीत होत नसतात."

रुत्विक- " याचा अर्थ आपण यापुढेही भेटणार आहोत तर !

रुचिरा- " अ..हो कदाचित् म्हणजे आयुष्यभरासाठी एकत्र यायचं असेल तर एकमेकांना पुरतं जाणून घ्यायला हवंच ना! "

रुत्विक- "हो का नाही. खरं तर *लग्न म्हणजे* नुसत्या पत्रिकेतील गुणांचं मिलन नव्हे तर दोन जीवांचं मिलन, त्यांच्या मतांचं, त्यांच्या आवडीनिवडींचं, त्यांच्या मनांचं मनोमिलन आणि ते होण्यासाठी एकमेकांशी पुरती ओळख अन् माहिती असायलाच हवी. तसंही घाईघाईने निर्णय घेण्यापेक्षा थोडा वेळ घेऊन एकमेकांना जाणून घेतल्यानंतर मग योग्य तो निर्णय घेतलेला कधीही चांगलाच नंतर पश्चाताप करण्यापेक्षा नाही का? "

रुचिरा- "हो खरं आहे तुमचं. माझ्यासाठीही खरं तर *लग्न म्हणजे* केवळ देवा ब्राम्हणांच्या साक्षीने एकमेकांवर अक्षता झेलत, होमाभोवती मारलेल्या सप्तपदी नव्हेत तर मंगळसुत्राच्या सहाय्याने दोन जीवांना प्रेमाच्या पवित्र नात्यात बांधणारी एक नवी जबाबदारी, नुसती जबाबदारी नव्हे तर तिची जाणीव, एक नवं नातं, नव्या कोऱ्या आयुष्याची नव्याने सुरुवात आहे. केवळ घरच्यांच्या इच्छेखातर अथवा त्यांच्या, नातेवाईक, मित्रमंडळींच्या दबावाला बळी पडून समोरच्या व्यक्तिला पत्रिका जुळतेय, वय वाढतेय, नवनिर्मितीचं सुत्र सुरु रहावं म्हणून, समाजाने घालून दिलेली रित म्हणून किंवा मग उतार वयात नुसता आधार म्हणून लगेचच होकार कळवून लग्न उरकणे केव्हाही चुकच.

*लग्न म्हणजे* भातुकलीचा खेळही नव्हे अन् अर्ध्यावर मोडणारा डावही नव्हे. *लग्न म्हणजे* प्रेम, विश्वास, अतूट नातं, जबाबदारी अन् बरच काही." पहिल्याच भेटीतल्या तासाभरांच्या गप्पांनंतर पुन्हा भेटण्याच्या वायद्यावर दोघेही आपआपल्या घरी निघून गेले.ठरल्या प्रमाणे ठरल्या ठिकाणी पुन्हा दोघांच्या दोन तीनदा भेटी झाल्या, मतं जुळली, मनं जुळली, विचार, आवडीनिवडी जुळल्या अन् मग दोघांच्याही घरच्यांच्या संमतीने पार पडला रुत्विक अन् रुचिराचा लग्नसोहळा. !! शुभमंगल सावधान !!

# १७. डेट भाग १-

पहाटे ८.३० ची वेळ. श्रीकांत ऑफिसला निघायच्या तयारीत.आतून स्वयंपाकघरातनं आईची प्रश्नांची सरबत्ती सुरु होती."डबा घेतलास का?, रुमाल, पाण्याची बाटली वगैरे वगैरे. नेहमीची गाडी पकडण्यासाठी श्रीकांंतची सुरु असलेली घाई आणि इतक्यात मोबाईलने कुणाच्या तरी फोनची वर्दी दिली.एका खांद्याला बॅग आणि कानाला मोबाईल लावत श्री घरातनं ऑफिसला जायला निघाला. समोरुन " आळोखे पिळोखे देत एक गोड मधाळ आवाज

ती- "गुड मॉर्निंग."

श्री- "सुप्रभात. आज इतक्या पहाटे पहाटे आमची आठवण कशी काय? "

ती- "का काढू नये?

श्री -"नाही म्हणजे तसं काही नाही. पण आज अचानक तुझा मला असा हा गुड मॉर्निंग म्हणणारा फोन याआधी कधी आला नव्हता म्हणून जरा आश्चर्य वाटलं."

ती- "अच्छा तर असं आहे होय ! बरं ते सगळं जाऊ दे. तुझा आजचा संध्याकाळचा काय प्लान आहे? "

श्री - अजून तरी काही नाही पण बघू, का गं? "

ती- "आपण भेटतोय आज संध्याकाळी."

श्री - हे काय असं अचानक. नाही म्हणजे भेटूया आपण, पण तसं काही खास कारण आहे का? "

ती- "हं. तसच समज हवं तर."

श्री - "बरं, कुठे भेटायचं? ".

ती- कुठे म्हणजे काय? आपल्या नेहमीच्या ठिकाणी कॅफेमध्ये. संध्याकाळी ठिक ७.०० वाजता. मी तुझी वाट बघतेय. ऑफिसची सगळी कामं भराभर आवर आणि ये लवकर."

श्री - "ओके मॅडम, जशी आपली आज्ञा. बरं मला एक सांग तू आज ऑफिसला गेली नाहीस? "

ती- "नाही.आज दांडी मारली, म्हटलं घरीच आराम करु."

श्री - "बरंय तुझं." ठिक आहे. भेटू मग संध्याकाळी." ती - श्री. ऐक ना !"

श्री - "बोल ना, ऐकतोच आहे मी."

ती- "श्री आय लव यू."

रस्ता ओलांडता ओलांडता श्री हे ऐकून थबकलाच. सिग्नल लागला होता, गाड्या थांबल्या होत्या. अवतीभवतीचे लोक श्री ला धक्का मारुन पुढे निघून गेले. तो मात्र तिथेच. स्तब्ध, निशब्द, कुठे तरी हरवल्यासारखा.

ती-" हॅलो, कुठे हरवलायस? ऐकतोयस ना!

श्री - स्वप्नातून अचानक जागं झाल्यासारखा.

"हा बोल ना ऐकतोय मी."

ती- " काय हा ! काहीच प्रतिक्रिया नाही तुझी, हो / नाही काहीतरी बोलशील ! आय एम अवेटिंग फॉर युवर रिप्लाय."

श्री - " गाडी पकडतोय, ऑफिसला पोहोचल्यावर फोन करु का? " ती -" बरं चालेल पण करशील ना नक्की कि विसरुन जाशील मला, ऑफिसच्या कामात."

श्री - " नाही मी करेन आठवणीने."

ती- बरं चल बोलू नंतर."

फोन कट करत श्री पुन्हा हरवून गेला तिच्या आठवणींत.

निशा आणि श्रीकांत. दोघांची काम करण्याची ठिकाणं, ऑफिस वेगवेगळी पण फिल्ड एकच. एके दिवशी ट्रेनिंगच्या निमित्ताने दोघांची ओळख झाली. एकमेकांचे नंबर एक्सचेंज झाले. पुढे मग व्हॉटसअप, फेसबुकवर चॅटिंग करता करता दोघांत खूप चांगली मैत्री जुळली आणि आता या मैत्रीला आणखीन थोडं पुढे घेऊन जाऊन एका प्रेमळ नात्याच्या दोरीने याची हलकिच रेशीमगाठ बांधायची असं निशाने ठरवलं होतं. त्याच दृष्टिकोनातून तिनं आज पहिलं पाऊल उचललं होतं. श्रीकांत तसा हुशार, दिसायला बऱ्यापैकी. एका मध्यमवर्गीय कुटुंबातला. नोकरीत परमनंट होता. गलेगठ्ठ नाही पण चांगला पगार. घरची परिस्थितीपण बरी होती. मुंबईत स्वतःचं घर. निर्व्यसनी. म्हणजे सामान्यतः मुलीच्या आणि तिच्या घरच्यांच्या ज्या अपेक्षा असतात त्यात चपखल बसणारा.

आज पहाटे पहाटे निशाने तिच्या बेडरुममधून सोडलेल्या या बाणाने श्री च्या काळजाचा अचूक वेध घेतला होता. स्वारी आज भलतीच खूश होती. हो कारण तुम्हाला माहित आहेच. त्याच्या डोळयांत, चेहऱ्यावर एक वेगळच तेज आलं होतं. खुलला होता तो अगदी आनंदाने. निशाला नकार देण्याचा प्रश्नच नव्हता. दिसायला गोड, सुस्वभावी थोडीथी मस्तीखोर, बडबडी. शिवाय दोघेही एकाच फिल्डमधले. श्री ने मोबाईलमधनं एक नंबर डायल केला.

श्री -" हॅलो, निशीकांत, अरे ऐकना एक गुड न्युज आहे."

निशीकांत श्री चा खास जिगरी मित्र.

निशीकांत- "अरे बोल ना भाई काय बोलतो. लग्न बिग्न ठरलं कि काय तुझं? ".

श्री - "तसंच समज हवं तर.

निशीकांत - "म्हणजे? "

श्री - "अरे नुकताच निशाचा फोन येऊन गेला. तिने मला प्रपोज केलं. संध्याकाळी भेटायला बोलवलय. काय करु, काय बोलू काही कळत नाहीय. म्हणून तुला फोन केला."

निशीकांत - "अरे करायचं आणि बोलायचं काय त्यात. सरळ हो बोलून मोकळा हो. साल्या नशीब काढलस तू यार. समोरुन एखादी मुलगी प्रपोज करते तुला म्हटल्यावर भाग्यवानच म्हणायला हवं तुला तर. बाकी सगळं सोड, पार्टी कधी देतोयस ते आधी सांग. "

श्री - " ती देईनच रे पण मला काही कळत नाही ये यार. विकेट पडलीये माझी तर."

निशीकांत-" अरे टेंशन घ्यायचं नाय द्यायचं समोरच्याला. ऑफिसमधनं हाफ डे ने घरी जा, छानपैकी ड्रेसिंग कर, मस्तपैकी गुलाबाचा गुच्छ घेऊन जा जाताना आणि हो नेहमीच्या ठिकाणी भेटण्यापेक्षा एखाद्या चांगल्या रेस्टाॅरंट किंवा कॅफेमधे घेऊन जा तिला. कारण अशा खास गोष्टींची ठिकाणं पण खासच असावीत मित्रा, लक्षात रहाण्याजोगी. बरं चल, मला पण कामं आहेत. रात्री फोन करुन कळव काय झालं ते. बेस्ट ऑफ लक मेरी जान, गो अहेड."

निशीकांतने दिलेल्या सल्ल्यामुळे श्री ला आता जरा बऱ्यापैकी कॉन्फिडन्स आला होता. त्याने लागलीच निशाला फोन केला.

श्री - " हॅलो निशा, बरं ऐक प्लानिंग थोडा चेंज आहे. संध्याकाळी आपण भेटतोय पण जागा मी सांगेन दुपारनंतर फोन करुन. चालेल ना तुला? "

निशा - "तु म्हणशील तिथे जाऊ.पण लवकर कळव मी वाट पहातेय."

दोघांनाही आता एकमेकांच्या भेटीची ओढ, हूरहूर लागून राहिली होती.हो कारण आजची भेट नेहमीच्या भेटीपेक्षा जरा वेगळीच होती..क्रमशः -



# १८. डेट भाग २-

निशाने पहाटे बेडरुममधून सोडलेल्या प्रपोजरुपी बाणाने श्री ची पुरती विकेट पडली होती. पठ्ठ्या शरीराने ऑफिसात पोहोचला खरा पण मनात मात्र संध्याकाळच्या भेटीची बेत आखणी सुरु होती. अशावेळी मनाला आवर घालणं जरा अवघडच.तीच गत श्री ची झाली होती पण त्याने मनाला आवरलं. दुपारनंतर हाफ डे टाकून पळायचं ठरल्यामुळे ऑफिसात आल्यापासनच श्री ने  कामं पटापट आवरण्याचा सपाटा लावला. बघता बघता लंच ब्रेक झाला. इच्छा नसतानाही त्याने कसेबसे चारपास घास पोटात ढकलले अन् साहेबांच्या केबिनमधे शिरला. अचानक तब्येत बिघडल्याचे कारण देत साहेबांकडनं अर्ध्या दिवसाची रजा मंजूर करुन घेतली.

आता मात्र स्वारी भलतीच खूश होती. धावतपळतच श्री ने रेल्वे स्थानक गाठले अन् जलद लोकल पकडून तो पोहोचला दादरच्या भारतमाता च्या गल्लीत. तिथल्याच एका साडीच्या दुकानातनं त्याने निशाच्या आवडत्या रंगाची चांगली साडी आणि त्याला मॅचिंग ब्लाऊजपीस खरेदी केलं. तसा श्री हुशारच. निशाशी व्हॉट्सअपवर बोलता बोलता त्याने तिच्या आवडीनिवडी जाणून घेतल्या होत्या. घरी येता येता त्याने एका रेस्टॉरंटमध्ये फोन करुन दोन कॉर्नर टेबल आधीच रिझर्व करुन ठेवले. नाक्यावरच्या फुलवाल्याकडे त्याने संध्याकाळसाठी छानपैकी लालभडक रंगाचा गुलाबगुच्छ तयार करुन ठेवायला सांगितला.९०% तयारी झाली होती. इमारतीच्या पायऱ्या चढता चढताच त्याने निशाला फोन करुन कुठे भेटायचं ते कळवलं.

श्री - " हॅलो ऐक मी तुला व्हॉट्सअपवर हॉटेलच लोकेशन पाठवलय.वेळेवर ये उशीर करु नकोस." निशा- "अरे आपल्या नेहमीच्या कॅफेमधे जाऊया ना." श्री - " नाही नको नव्या नात्याची सुरुवात नव्या जागेत नव्या टेस्टसहीत करु."

निशा- " बरं, ठिक आहे  मी ठेवते आता फोन. संध्याकाळी भेटून बोलू. कामं आवरते आधी."

श्री - "जास्त उशीर करु नकोस, मेकअपमधे वेळ वाया घालवू नकोस. तू आहेस तशीच आवडतेस मला. वाट पहातोय लवकर ये."

निशा- " हो रे बाबा, येते आता फोन ठेव, नाहीतर कामं रहातील तशीच आणि मग रात्री घरी आल्यावर आईचा ओरडा खावा लागेल. bye ठेवते फोन."

फोन कट झाला. दोघंही आता  उघड्या डोळयांनी भल्या दुपारी संध्याकाळच्या पहिल्या डेटची स्वप्नं पहात होते. श्री ने कपाटातनं   इस्त्री केलेले कपड्यांचे नविन जोड बाहेर काढले. संध्याकाळचे पाच वाजले होते.आईला चहा करायला सांगून श्री.तयारीला लागला. नाही नाही म्हणता त्यानेच अर्धातास घेतला तयार व्हायला. श्री ने जीन्स आणि त्यावर व्हाईट टि शर्ट घातलं होतं.कपाटातनं परफ्यूम काढला आणि त्याचा सुगंध अंगावर, कपड्यांवर रुळेपर्यंत मारला. आईने केलेला चहा उभ्या उभ्याच घेतला.

आई- "अरे जरा नीट बसून पी चहा. एवढी कसली घाई. आणि एवढा नटून थटून चाललायस कुठे? "

श्री- " अगं मित्रांसोबत फिरायला चाललोय."

आई- " बरं मग जेवून येणार आहेस बाहेरनं कि जेवण ठेवू काढून तुझ्यासाठी?

श्री -" नाही नको तुम्ही जेवून घ्या.मी बाहेरनं जेऊनच येणार आहे."

इथे निशाची पण तशीच तर्हा.दहावेळा आरशात मुरडून झालं होतं.तरी आपलं आरशात बघणं सुरुच. निशा - " आई, बरी दिसतेय ना मी? अवतार तर वाटत नाहीये ना?

निशाची आई - " तू आधी एका जागी उभी रहा पाहू तिकडे. दहांदा आरशात बघून झालं असेल तरी मला विचारतेय. हं बरी दिसतेस. केस नीट कर जरा आणि काय गं एवढा नट्टा पट्टा करुन चाललीयेस कुणाला भेटायला? खरं सांग."

निशा - "अमृतासोबत चाललीये शाॅपिंगला."

निशाची आई- " शाॅपिंग अमृताची मग तू का एवढी नटलीयेस? तुझी लक्षणं काही मला ठिक दिसत नाहीयेत. तू ये घरी मग बघते तुला.बाबांनाच सांगितलं पाहिजे तुझ्या लग्नाचं बघायला आता."


निशा - " तू गप्प बस हा आई. जाताना उगाच बडबड करु नकोस." येते मी चल, आणि जेवून येणार आहोत आम्ही, वाट बघू नकोस."

निशाची आई- " बाबा यायच्या आत घरी ये नाहीतर मी जबाबदार नाही."

निशा-" हो गं, चल bye."

इथे निशा घरातनं बाहेर पडली आणि तिथं श्री ने बाईकला किक मारली आणि तो निघाला. वाटेत नाक्यावरनं फुलवाल्याकडनं गुलाबगुच्छ घेतला आणि पोहोचला एकदाचा हाॅटेलमधे. श्री जात्याच भटक्या आणि खवय्या असल्याने त्याने अगदी छानसं आणि आतलं वातावरण मन प्रसन्न करुन टाकणारं असं हाॅटेल डेट साठी निवडलं होतं. खवय्यांची तिथे नेहमीच गर्दी म्हणून त्याने आधीच आगाऊ बुकिंग केली होती. ७ वाजून गेले होते. माणसं येत जात होती. श्री ची नजर दरवाज्याकडे अन् घड्याळाकडे. श्री च्या मनात कालवाकालव सुरु होती. ' यार शीट अजून किती वेळ वाट पहायला लावणार आहे हि'. घड्याळात सव्वा सात वाजले होते.इतक्यात हाॅटेलचा दरवाजा उघडला गेला.एसी फुल ऑन होता तरीहि एसीच्या त्या कृत्रिम हवेला लाजवणारी वाऱ्याची एक झुळुक हलकेच आत आली. लाल ड्रेस घातलेली, कानात

मोरपिसांचे डुल, कपाळावर इवलीशी चंद्रकोर लावलेली, गुलाबी गालांची, कमनीय बांध्याची, गोड गुलाबी ओठांच्या पाकळीला हलकेच चावत ती दरवाजातनं आत शिरली होती.अस्मानातील परीच जणू अवतरली होती आज इथे श्री समोर. ती आली तिने पाहिलं तिने चुकवला ठोका एका क्षणात त्याच्या काळजाचा. तो मात्र स्वप्नात असल्याप्रमाणेच एकटक पहात बसला होता तिच्याकडे.. क्रमशः



# १९. डेट भाग ३ -

निशा-" तू माझ्याकडे असं नुसतं आ वासून बघत बसणारेस कि काही बोलणार पण आहेस! हॅलौ, बोल ना काहीतरी, एवढी तुझ्यासाठी नटून थटून आली आहे मी. तिला अर्ध्यावरच तोडत श्री ने त्याचं मौन सोडलं. श्री - " तुज अस्मानातील परी म्हणू कि इंद्रलोकिची अप्सरा म्हणू..

तो पुढे काही बोलण्याआधीच रेस्टाॅरंटमधल्या लोकांनी वा वा म्हणायला सुरुवात केली होती. निशाची अवस्था आता लाजाळूच्या झाडासारखी झाली होती. श्री पुढे काही बोलणार त्याआधीच तिने त्याच्या ओठांवर हात ठेवत त्याला थांबवलं.

निशा-" पुरे, तुला काही लाज लज्जा आहे कि नाही. एवढ्या मोठ्याने स्तुती करायला नव्हतं सांगितलं. काय बोलत असतील लोकं, शी मला ना कसंतरीच वाटतय. तू ना वेडा आहेस. तुला ना काही सांगायलाच नको."

श्री -"कसंतरीच म्हणजे नेमकं कसं? "

निशा -" मला नाही सांगायचं जा."

श्री - " बरं राहु दे. तू काय खाणार स्टार्टरमधे? " निशा-" तुला जे आवडेल ते मागव. असंही आता तुझी आवड ती माझी आवड.माझ्या आवडीनिवडी तुझ्या आवडीनिवडींमधे मिसळायचं ठरवलय मी."

श्री - " हो का? "

निशा-" होच मुळी."

ऑर्डर देण्यासाठी श्री ने वेटरला आवाज देत हलकासा इशारा केला. इशारत मिळताच वेटर हातात एक तबक घेऊन आला. त्या तबकावर एक वेलवेटचं मखमली, लाल-गुलाबी रंगाचं आच्छादन होतं. ते त्याने श्री च्या हाती सुपुर्द केलं. वेटरने आणलेलं तबक आपल्या हाती घेत ते त्याने निशासमोर ठेवलं.

श्री - " बघ उघडून."

निशा-" हे काय आता नविन? काय आहे यात? " श्री -" ते उघडल्याशिवाय कसं कळेल? "

निशा-" बरं." असं म्हणत निशाने तबकावरचं ते आच्छादन बाजूस सारलं.

निशा- " वा किती सुंदर."

तबकात गुलाबाच्या पाकळ्या पसरल्या होत्या. त्यावर एक छानशी पिवळया जर्द रंगाची साडी तिला मॅचिंग ब्लाऊजपीस आणि त्या शेजारी लाल टवटवीत गुलाबांचा छानसा गुच्छ. श्री ने निशाच्या प्रेमाला दिलेला हा असा प्रतिसाद तिला खरच खूप भावला होता.

श्री -"मग, नजराणा आवडला का राणीसाहेबांना ? " निशा -" हो राजे, खरच खूप छान आहे. तू ना काय बोलू, तू खरच वेडा आहेस ".

श्री - " हं हे तुझच वेड आहे.बरं एक प्रश्न विचारु? " निशा - "एक कशाला हवे तेवढे विचार पण त्याआधी काहीतरी खायला मागव, भुक लागलीय खुप."

श्री -" अरे हो"

असं म्हणत श्री ने वेटरला ऑर्डर दिली. खाता खाता दोघांचा काही क्षणांसाठी थांबलेला संवाद पुन्हा सुरु झाला.

निशा- "छान आहे टेस्ट, क्वांटिटि पण छान आहे. बरं, तू काहीतरी विचारत होतास मला."

श्री - काही नाही हेच कि.."

श्री ला मधेच थांबवत निशा बोलू लागली.

निशा-"हेच ना कि मी तुला कसा काय प्रपोज केला वगैरे."

श्री ने होकारार्थी मान डोलवली.

निशा- "अरे कामाला लागल्यापासून नातेवाईकांनी आईबाबांच्या मागे तगादा लावलाय नुसता. मुलगी आता शिकली, चांगली कामाला लागली, लग्नाचं बघा आता तिच्या. यार या लोकांना ना स्वतःपेक्षा इतरांची जाम पडलेली असते."

श्री जोरात हसला.

निशा - " बघ ना, आमचं आम्ही घेऊ बघून. यांना भारी काळजी. आई बाबा पण त्यांच्या नाचण्याने नाचतायत मग मीच विचार केला कि नातेवाईक दाखवणार त्या मुलाशी लग्न करण्यापेक्षा तुझ्याशीच का करु नये. चांगला कमावतोस, तुझे घरचे चांगले आहेत, मुंबईत स्वतःचं घर आहे, स्वजातीय आहेस, निर्व्यसनी आहेस आणि माझा खुप चांगला जवळचा मित्रही आहेस. घरच्यांनी नकार द्यायचा प्रश्नच येत नाही. म्हणून मग ठरवलं तुला विचारायचच आणि मग केलं जे मनात आलं ते. तसाही तू मला नेहमी समजून घेतोस, माझी काळजी घेतोस. मी हि तुझ्याशी बोलताना लगेच मनमोकळी होते. म्हणून मग..." असं म्हणत मगाशी लोकांसमोर लाजणारी निशा बोलता बोलता समोरून श्री च्या शेजारी येऊन बसली अगदी त्याला बिलगून. तिला आता जगाची पर्वा नव्हती कारण तिचं जग आता श्री भोवती वसायला लागलं होतं. बोलता बोलता श्री ने हि तिचा हात हाती घेतला. श्री - "काळजी करु नकोस, मी हात कधीच हातचा सुटू देणार नाही."

आता दोघांनाही आपण रेस्टॉरंटमधे बसलो आहोत याचा पुरता विसर पडला होता. हरवून गेलो होते ते दोन जीव एकमेकांच्या डोळयात. इतक्यात वेटरने जाग आणत, "साहब और कुछ "

श्री - "नाही नको बिल आण." चल, ऊरलेल्या गप्पा सीफेसवर मारु"

असं म्हणत श्री आणि निशा बिल पेड करुन निघाले. वाऱ्याशी स्पर्धा करत श्री ची बाईक सीफेसच्या दिशेने धावत होती. कधी नव्हे ती निशा आज त्याच्या मागे त्याला घट्ट बिलगून बसली होती. बघता बघता दोघेही चौपाटीवर पोहोचले. गार वारा सुटला होता, लाटांची छान गाज ऐकू येत होती. बाईक पार्क करुन दोघंही कठड्यावर बसले.पुन्हा गप्पा सुरु झाल्या.

निशा-" किती छान वाटतय ना इथे. मस्त वारा सुटलाय, लाटांचा आवाज ऐकू येतोय.भारीच वाटतय. तुला कधी वाटलं होतं आपण हे असे इथे येऊन असे..."

श्री - "इथे येऊन रोमांस वगैरे करु असच ना !"

निशा- "तु ना लगेच, कुठून कुठे पोचतोस, पागल. मला इथे गप्पा मारत बसू असं बोलायचं होत. बरं ऐक ना, आपलं थोडं बऱ्यापैकी सुरु झालं ना कि मग घरच्यांना सांगून मोकळं व्हायचं.आपण हे असे लपतछपत एकमेकांना भेटणार, मग कुणीतरी आपल्याला बघणार, घरी सांगणार ही भिती.त्यापेक्षा आपणच आपलं सांगितलेलं बरं नाही का? मी तर सांगणार आहे माझ्या आईबाबांना आणि तु? "

श्री - " सगळं तुच बोलतेस, तुच ठरवतेस. किती किती बोलतेस."

निशा- "मला ना श्री खूप काही बोलायचय तुझ्याशी, खूप काही सांगायचय तुला. नाही म्हणजे मित्र म्हणून आपण बोलत असतोच पण आता त्याही पलीकडे जाऊन बोलायचय मला तुझ्याशी.मित्र म्हणून जगलो असू काही क्षण आपण एकत्र पण आता उरलेले सारे क्षण मला

तुझी प्रेयसी तुझी पत्नी बनून जगायचेत. तू देशील ना साथ मला? सोडणार तर नाहीस ना अर्ध्यावर? "

श्री - "ते बघू पुढचं पुढे."

हसत श्री म्हणाला. श्री ला चिमटा काढत,

निशा -"तु सोडून तर बघ.जीवच घेईन तुझा."



# कसं वाटलं पुस्तक मित्रांनो?

फ़ुकट असलं तरी दर्जेदार आहे ना?

काही लोकांचा असा समज आहे की जे फ़ुकट मिळतं ते कमी दर्जाचं असेल. पण तसं नसतं. आपल्याला आपले आईवडील मिळतात ना की ते आपण विकत घेतो? आणि त्यांचे संस्कार? आणि आपला देश आपलं राष्ट्रीयत्व? अगदी आपल्या आजूबाजूच्या हवेतला ऑक्सिजनही फ़ुकटच मिळतो ना. आणि हा मौल्यवान मनुष्यजन्मही फ़ुकटच मिळाला की आपल्याला!

तेव्हा मित्रांनो जे जे फ़ुकट ते ते फ़ालतू असा समज असलेल्या लोकांना एकदा ई साहित्यच्या साइटवर आणा. ई साहित्यची पुस्तकं वाचायला द्या. तुम्ही जे पेराल तेच उगवेल. जर तुम्ही समाजात चांगली मूल्यं पेराल तर तुम्हालाही या समाजात चांगली वागणूक मिळेल. समाज म्हणजे आपणच की. निदान आपल्या आजूबाजूचा समाज तरी मूल्यप्रधान करुया.सगळं काही पैशानंच करायचा अट्टाहास नाही चालणार.

चला तर मित्रांनो, एक भव्य चळवळ उभारुया. यात प्रत्येकाने आपला सहभाग घेतला तर हा बाराकोटींचा महाराष्ट्र जगातला सर्वोत्कृष्ट अभिरुचीपूर्ण वाचकांचा प्रदेश बनायला वेळ लागणार नाही.

टीम ई साहित्य

esahity@gmail.com

www.esahity.com

एक प्रसन्न अनुभव